REGISTERD NO 7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ | अकोला, रविवार ता० ५ माहे एप्रिल सन १८७४ इ० | अंक १४

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| कुडकळ अंकास | ८४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळींस | ८१८१ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळींस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

### गजकरणाचें औषध.

हें औषध गजकरणावर चालून खरून, नायटे यांवरही चालतें कि० .... ८६

### जाहिर खबर.

### दिवाणी कामाचे नमुने.

वऱ्हाडांतील वकील लोकांस व कोर्टांत काम चालविणाऱ्या इतर लोकांस आह्मी कळवितो कीं खालीं लिहिल्या पांच प्रकारचे नमुने फुलस्केप कागदावर टाइपानें छापलेले आह्माकडे विकावयास तयार आहेत. व ते शेकडा एक रुपया भावानें पाहिजे त्यास मिळतील. बाहेर गांवीं टपालांतून नेणे असल्यास त्याचा खर्च शिवाय पडेल.

१. रोख्यावरून करावयाच्या फिर्यादी
१. खाते बाकीच्या फिर्यादी
१. वकील पत्रें
१. जामीन कतबे
१. दरखास्ती

५

येणेप्रमाणें नमुने विकावयाचे आहेत. किंमत रोख पाठविली पाहिजे. कळावें तारीख १ मार्च सन १८७४ इसवी.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

### जाहिरखबर

आम्ही सर्व लोकांस कळवितों कीं, येथील हायस्कुलांतील मुलांनीं स्थापन केलेल्या वाचनगृहांत सर्व प्रकारचे लोकांस येण्यास सुलभ पडून त्यांस त्यापासून इच्छित कार्यभाग प्राप्त व्हावा ह्या हेतूनें आम्ही सर्वांस ह्या पुस्तकगृहाचे वर्गणीदार होण्याची मोकळीक ठेविली आहे. आमचे अकोल्यांतील हितेच्छू ही संधि जाऊं देणार नाहींत व अशा सत्कृत्याचा उत्कर्ष करण्याकडे लक्ष देतील अशी आशा आहे. मनोरंजक पुस्तकांचाही संग्रह केला आहे

वर्गणीचे दर

४ आणे, २ आणे, व १ आणा.

धोंडो बाळकृष्ण देव
वा. गृहाचे स्पेनेजर.

## नोटिसा.

नोटिस—अंबाजी सोनार वैश्य दुकान खामगाव यांस रामकृष्ण वल्लद भवानी सोनार दुकान खामगाव यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे सोनारकीचे संबंधांत तुह्मी पौष वद्य ३०चे दिवशीं आमचें काम करून देऊन ७५ रुपये घ्याव्याचा आह्माशीं करार केला. व रुपये कामाचेच मागितले तेव्हां ५ तोळे सोन्याची ठुशी १ व रोख रुपये ३० असें आह्मी तुह्माजवळ अमानत ठेविले परंतु तुह्माकडून सदरहू काम मुळींच झालें नाहीं असें असतां तुह्मी आमच्या रकमा आह्मांस परत दिल्या नाहींत. तुह्माला पुष्कळवेळां विठोबा सोनार, नानकाराम, पुंजाजी, व वासुदेव सोनार इत्यादी भले लोकांसमक्ष मागणें केलें असतां तुह्मी कांहींतरि गोष्ट टाकली तेव्हां आह्मी तुह्माला असेंही सांगितलें कीं ८ रुपयांचे स्टांप कागदावर दस्तऐवज करून द्यावा. त्याला तुह्मीं नाकबूल गेला. असो. आतां आह्मांस त्या सोनारसंबंधाची गरज नाहीं सबब आतां आमची ठुशी व ३० रुपये ही नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांचे आंत आह्मांस पोंचते करून द्यावे व आमची पावती घ्यावी. असें तुह्मी न कराल तर तुह्मावर दिवाणींत फिर्याद करून खर्चसुद्धां सर्व रकम भरून घेऊं. व या नोटिशीचा खर्चही तुह्माला द्यावा लागेल कळावें तारीख १८ माहे मार्च सन १८७४ इसवी.

( सही )रामकृष्ण वल्लद भवानी सोनार
दुकान खामगांव यांचे हातची
निशाणी लुद.

नोटिस—बापू बिरा मुकाम बाळापूर यास कन्हय्यालाल तुळशीदास दुकान अकोलें यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडून ६॥ रुपये घेणें आहे व तुमचा कांहीं माल आह्माकडे आहे त्याला बारा महिने झाले. तुह्मी येऊन उलगडा केला नाहीं. गडी पाठवून एक दोन वेळां तुह्माला कळविलें व आतां नोटिस देऊन कळवितो कीं एक महिन्याचे आंत तुह्मी आमचे रुपये देऊन आपला माल घेऊन जावा. पुढें मालाची तसनस झाल्यास आह्मी जबाबदार नाहीं. कळावें तारीख ३० मार्च सन १८७४ इसवी.

( सही )कन्हय्यालाल तुळशीदास साहू
दस्तुर नानकराम.

नोटिस—कृष्णाजी वल्लद धर्माजी पुरमकार राहणार मौजे जानेरी तालुके मोर्तिजापूर यास कन्हय्यालाल तुळशीदास दुकान अकोलें यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे दोन तीन वर्षांपासून खातेबाकी बद्दल रुपये १५० शिवाय व्याज घेणें आहे त्याबद्दल तीन वेळां मागणें केलें असतां देऊं, दिवाऊं ह्मणतां आणि रुपये देत नाहीं यासकरितां मुद्दाम ही नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत आमचे सर्व रुपयांचा उलगडा करावा. याप्रमाणें न केल्यास तुह्मावर दिवाणींत दावा केला जाऊन खर्च सुध्दां सर्व रुपये भरून घेतले जातील. कळावें तारीख ३० माहे मार्च सन १८७४ इसवी.

( सही )कन्हय्यालाल तुळशीदास साहू
दस्तुर नानकराम.

नोटिस—गुलामनबी वल्लद गुलामचंद मदद हिंदुस्थानी स्कूलमास्तर मुकाम पातुर शेलबाबू यांस गुलामहुसेन वल्लद रहिमत अली इनामदार राहणार अकोलें यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं पातुर येथें जुमामशिदीचे नजीक चौदिवालीचे आंत आमचे मालकीची खाली जागा बहूत वर्षांपासून आहे. व तेथें आमची महिवाट होत आहे असें असतां त्या जागेंत तुह्मी बिगार हक्कानें मकान बांधतां आहां असें समजल्यावरून आह्मी तुह्माला तोंडी व करण्याविषयीं पत्र पाठविलें त्याचा जबाब तुह्माकडून आला नाहीं सबब आह्मी मुद्दाम पातुरास येऊन तुह्माला हरकत करीत असतां तुह्मी आह्माशीं तक्रार केली त्यावरून तुह्माला मुद्दाम या नोटिशीनें असें कळवितो कीं तुह्मी आमचे जाग्यांत दिवाणी बांधण्याचें काम चालविलें आहे तें ही नोटिस पोंचतांच एकदम मढकूब करावें. व याप्रमाणें आठ दिवसांचे आंत न झाल्यास तुह्मावर गैरकायद्याचें काम केल्याबद्दल फौजदारींत व जागा ताब्यांत घेण्याबद्दल दिवाणींत फिर्यादी केल्या जातील. व या नोटिशीचा आणि फिर्यादी संबंधी सर्व खर्च तुह्मापासून घेतला जाईल. कळावें तारीख ३१ माहे मार्च सन १८७४

( सही ) गुलामहुसेन वल्लद रहिमतअली इनामदार अकोला.

नोटिस—आबु वल्लद कडबाजी माळी राहणार गिरिगाव तालुके अकोलें यांस खाली सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं सुमारें तीन महिने झाले तुह्मी आमचे घरीं येऊन १९९ रुपयांचा दस्तऐवज एक रुपयाचे स्टांपावर लिहून दिला आहे व आह्मी कपाशी विकून आलेले रुपये रोख तुह्मास साक्षीदारासमक्ष दिले आहेत व असें खोटे वाकट केल्यानें रुपये बुडतील असें नाहीं व आतां आह्मास तुमचा इतबारही नाहीं यासकरितां ही नोटिस पोंचल्या पासून आठ दिवसांत व्याजासुध्दां आमचे रुपये रोख द्यावे. तसें न कराल तर तुह्मावर फिर्याद करून खर्च सुध्दां सर्व रुपये भरून घेऊं. कळावें तारीख ३० माहे मार्च सन १८७४ इसवी.

( सही )मानाजी वल्लद दामाजी माळी वस्ती माहेगांव दस्तुर खुद

## पत्रव्यवहार

या सदरांतील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

दहिहंडा तालुके अकोट येथून:—

वि. वि. आपला कारखाना सुरू झाल्यापासून हा माझा पहिलाच प्रयत्न आहे तर आपण खालीं लिहिलेल्या चार ओळी छापून प्रसिद्ध करा ह्मणजे पुढें दुसरे विषयांवर आर्टिकल देण्यास मला उत्तेजन येईल.

आमचे गांवीं सुमारें दोन वर्षांचे मागें किसनसिंग चि. का. होते ते चांगले स्वभावाचे असून आपले कामांत मोठे दक्ष असत त्यांणीं येथें स्टेशनासमोर बगीच्याची स्थापना केली आणि इलिचपूर वगैरे ठिकाणाहून मोठ्या प्रयासानें झाडें आणून त्या बगीच्यांत लाविलीं आणि आपले पदरचे रुपये ६ पाणी भरण्यास देऊन त्यास पाणी घालून लेकराप्रमाणें झाडें वाढविलीं परंतु येथील स्टेशन मोडून त्यांची बदली झाली. आणि येथें रिपोर्टिंग औटपोस्ट केलें ह्मणजे डायरी व मुचलके वगैरे सर्व काम चि. का. यास लिहिणें परंतु पगार मात्र हेडकानस्टेबलचा मिळावा. अशा प्रकारची ही जागा करून या जागेवर पातुरचे हेडका. नामदारखां यांची नेमणूक केली. त्यांणींही उत्तम रीतीनें काम केलें ह्मणून त्यास वाशिम जिल्ह्यांत चि. काची जागा देऊन बदली केली, पुढें त्यांचे जागेवर अकोले तालुके पोलिस पैकी चांद मिरजा हेडका. यांची नेमणूक केली. त्यास आज सुमारें दहा महिने झाले. तितक्या अवसरांत त्यांणीं स्टेशनचे हद्दींतील गाव ५६ यांचा चांगला बंदोबस्त ठेविला आहे. गुन्हे वगैरे बहुतसे होत नाहींत. व गावचे हे चोरटे लोकांचा चांगला बंदोबस्त ठेऊन गावकरी यांस सुख दिलें आहे. सदहू हेडका. आल्या दिवसापासून इलाक्यांतील व गावकरी लोक यांस न्याय चांगले मिळून सुख होत आहे. हे गृहस्थ चांगले स्वभावाचे असून नम्र आहेत. आपले कामांत मोठे दक्ष व मेहनती आहेत. अशा नेकीच्या इसमांनी नौकरास जर करितां जनाब पो. सु. साहेब बाहदुर मेहेरबानी करून चि. का. ची जागा देतील तर ते आपलें काम आणखी उत्तम रीतीनें करतील व खात्यांतील दुसरे लोकांस हुशारीचें काम करण्यास उत्तेजन येईल. हे मनुष्य स्वतः लिहिणार असून कायद्याचे ही बरेच माहितगार आहेत. अशा सुशिक्षित मनुष्यास सरकारांनीं चि. का. ची जागा द्यावी हे योग्य आहे ह्मणून आह्मी शिफारस करितो. सदरहू हेडका. यांनीं ही आपले पदरचा पैसा खर्च करून बगीच्या उत्तम होत आणिला आहे. आजून ही सरकार लक्ष पुरवून बगीच्यास मदत देतील तर तो आणखी उत्तम दशेस येईल असो.

आमचे जिल्ह्याचे मे० सु० साहेब बहादूर आपले खात्यांतील लोकांची हुशारी व लायकी आणि हक्क पाहून प्रमोशन देत आहेत ह्मणून त्यांजकडेही आह्मी शिफारस करितो. कळावे

एक दहिहांडेकर.

मे० बरारसमाचार अखबारवाले जनाब:—

अल्ला आपकु सलामत रखे. मै जातका फकीर हूं. मै रहनेवाला शाहरका हूं. मक्केशरीफकु गयाथा. उधासे मुलुख देख देखके अपने गांवकू जानेके लीये, ये रस्तेके उपर मकगांव जामोद हय. यहा आके खेरडी बेसके ऊपर, तकियेमे मुकाम किया, लीखनेका मतलब ये हय के, बराडमे कहीबी मुसाफरलोगोके लिये, तकलीफ न होगी, लेकीन, ये बस्तीका, अजब तमाशा देखनेमे आया सो आपके खिजमतमे लिखाचाहताहु. इसपर गेरेवास्ते और मेरेमाफक मुसाफरोकेवास्ते जरा नजर देबगे तो आपके उपर पैगंबर न्याहत मेहेर देवेगा.

मै जिस बख्त मुकामपर आपहुचा, उस बख्त ये तकियेके, पहाडपरखपर एक हनुमानका मकान हय. वहा एक मेरे सातका बेरागी उतरनेके लिये गया और रहा. सुबोके वख्त गावमे पेटके माफक मंगके दुसरे मुकाम जानेका इरादाथा. दो घडी दीन आया इतनेमे एक धर्माल वेहेनेवाले माळीने आके वो बैरागीका सामान निकालनेकेवास्ते फर्माया और न होत गाली गुफतार करने लगा. मैबी वहा जाके पहुचा तो मुजकुबी उसीमाफक गाली दिया मैने उसे ये पुछाके ए मकान, आपने बंधा हय क्या? इतनी बात पुछतेके सात पैरकी जुती निकाली. क्या गजब हय के ऐसे बडे बस्तीमे ये अंधार हय. बाद मै तलाष किया तब मालुम हुवाके ये शक्स धर्मालका वहनेवाला हय. इसकू सरकारसे इनाम हय. लेकिन ये मकानपर उसका दया नही. कोयि बैरागीने ये मकान मुशाफरोकेवास्ते बंधा हय ये आदमी उसमे अपना अनाज, नजदीक जनावर बांधनेकेवास्ते झोपडा बनाया हय. ये मूजोर हय, इसका ये सबब होगा के पहेल और पटवारीकी कुमक होगी. इसलिये ये शक्स इतनी बात करता हय. आब मैने आपके पास मारूना कियेकेमाफक तहशिलदारोतक खबर जाना चाहिये और उसका सामानवगैरा चीजबस्त फेकवाना चाहिये. ऐसा होनेसे जिसने ये मकान मुशाफरोकेवास्ते बंधा हय उसका चीन होयेगा. हिंदूमे ऐसी बात होना ये गैर हय; हमारे कडवे मुसलमिनके तरफसे ऐसा होनेकी कुछ हैरियत नही हय. फजल मौलाका, अबाद रहो बाबू.

तारीख ४ सफर सन १२९० हिजरी.

शाहरका मुसाफर फकीर.

# वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ४ शके १७९६

## वऱ्हाडांतील राज्य व्यवस्थेची अदलाबदल.

वऱ्हाड प्रांत इंग्लिश सरकारचे ताब्यांत येऊन २० वर्षें झाली इतक्या काळांत राज्यव्यवस्थेच्या संबंधानें यांत बरेच फेरफार झाले. व अलिकडील चालू वहिवाटींतही या आठवड्यांत फेरफार झाला हाणून आह्मी आपल्या वाचणारांस जुन्या माहिती सुद्धां ही गोष्ट थोडक्यांत सांगतो.

आरंभीं ह्मणजे सन १८५३ इसवी मध्ये सार्‍या वऱ्हाडांत ५ युरोपियन अधिकारी होते व त्यांच्या हाताखालीं क्लार्क असत. डे० कमिशनर दोन होते त्यांस दक्षिण भाग व उत्तरभाग ह्मणत असत. पुढें तितक्यानें काम संपत नाहीं मुलूख फार मोठा आहे असें सन १८५६ सालीं आढळून आलें. मग सन १८६० सालीं नेमणुका झाल्या त्या

१ कमिशनर.
४ डेपुटी कमिशनर.
८ असिस्टंट कमिशनर.
११ एकस्ट्रा असि० कमिशनर.
१ इनाम कमिशनर.
१ जेल सुपरिंटेंडेंट.
१ पोलिस सुपरिंटेंडेंट.

मग प्रत्येक खातें वाढू लागलें. सन १८६२ सालीं, पोलिस खातें व्यवस्थित रीतीनें वाढविलें. सन १८६६ सालीं विद्याखात्याची स्वतंत्र स्थापना झाली. सन १८६७ चे जुलई महिन्यांत दोन कमिशनर एक पूर्वभागचा व एक पश्चिम भागचा असे केले. व एलिचपूर हा पाचवा जिल्हा केला. सन १८७० सालीं या प्रांतांत सर्व, व्यवस्था हिंदुस्थानांतील इतर इंग्लिश राज्य व्यवस्थे प्रमाणे होऊन अधिकारी नेमिले ते.

२ कमिशनर.
५ डे० कमिशनर.
१५ असिस्टंट कमिशनर.
८ एकस्ट्रा असि० कमिशनर.
१ पोलिस इन्स्पेकटर जनरल,
६ पोलिस सुपरिंटेंडेंट.
२ असि० पोलिस सुपरिंटेंडेंट.
१ रिविन्यु सर्व्हे सुपरिंटेंडेंट.
१ डेपुटी सुपरिंटेंडेंट.
८ असिस्टंट सुपरिंटेंडेंट.
१ स्यानिटरी कमिशनर.
२ सिविल सर्जन.
२ असिस्टंट काटन कमिशनर.
१ रजिस्टर खात्याचे इन्स्पेक्टर जनरल.

पुन्हा यातील कमिशनरच्या कामाची मागील आठवड्यांत अदला बदल झाली. ह्मणजे पूर्वभाग व पश्चिम भाग कमिशनर होते ते रहित केले व एक कमिशनर आणि एक जुडिशियल कमिशनर अशा नेमणुका आहेत. या योगेकरून प्रत्येक कमिशनराचा साही जिल्ह्यावर त्यांच्या त्यांच्या संबंधाने अधिकार राहिला पण येणें करून रयतेस सदर स्टेशनांत येण्या जाण्याच्या संबंधानें जरा गैरसोय होईल असें वाटतें तसेंच इतके झाल्याप्रमाणें रिविन्यु व जुडिशियल कामाचे खालील अधिकारी ह्मणजे तहशिलदार, असिस्टंट कमिशनर व डेपुटी कमिशनर यांचीं मिश्र कामें राहिलींच आहेत. इंग्रजी अमलांत जसे जडज व कलेक्टर आहेत तशा प्रकारचे कांहीं स्वतंत्र भेद केले, असते तर बरें होतें. पण अमानी मुलूख ह्मणून तूर्त बेत रहित असेल तर न जाणो. असतु. याप्रमाणें प्रस्तुत वऱ्हाडचे राजव्यवस्थेची स्थिति आहे.

## वऱ्हाड.

मेजर बेल साहेब इंचार्ज जुडिशियल कमिशनर बुधवारी उमरावतीकडे गेले व तेथून परभारें चिखलदऱ्यास गेले असें समजतें.

—ooo—

पहिले तारखे पासून कमिशनर व जुडिशियल कमिशनर यांच्या स्वतंत्र नेमणुका झाल्या व कामें अमलांत येऊ लागलीं. पण त्यांच्या हाताखालील इस्टाब्लिशमेंटाची कायम नेमणूक अजून झाली नाहीं, तिजकडे लोकांचें विशेष लक्ष्य लागलें आहे. जुडिशियलचे क्लार्क आफ धी कोर्ट यांस पगार २०० रुपये राहून कमिशनरचे क्लार्क आफ धी कोर्ट १२० रुपये पगाराचा होणार, तेव्हां हल्लींच्या व्यवस्थेची अदला बदल कशी काय होते पहावें. कोणी ह्मणतात कीं रा०रा० भास्कर सखाराम यांस अकोल्यास जुडिशियलचे क्लार्क आफ धी कोर्ट नेमून रा० रा० माधवराव हरि यांस डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ धी कोर्ट नेमून त्या जागेचा पगार १५०रुपये आहे ह्मणून आणखी ५० रुपये यांस कमिशनर देणार व या गोष्टीच्या उलगड्याकरितांच उमरावती डिपुटी कमिशनरकडील क्लार्क आफ धी कोर्टची जागा अजून रिकामी राहिली आहे. व असें झालें असतां रा० रा० केशव जयकृष्ण देशपांडे जे हल्लीं उमरावती डि० क० आफिसांत काम करीत आहेत ते कमिशनरकडील १२० रुपयांचे जागेवर नेमले जातील असेंही ह्मणतात. परंतु तथ्य समजत नाहीं. आतां लवकरच या गोष्टीचा निकाल होईल.

—ooo—

रा० रामचंद्र भगवंत उमरावतीचे वकील यांस सस्पेंड करून असा हुकूम दिला आहे कीं पदरचे पैसे लावून कामें केल्याबद्दल ३०००० रुपयांचे दस्तऐवज त्यांजपाशीं आहेत ते त्यांनीं एक महिन्याचे आंत रद्द करून द्यावे? नाहीं पेक्षां त्यांची सनद रद्द केली जाईल. व त्याप्रमाणें डिपुटी कमिशनर साहेबांनीं त्यांस हुकूम फर्माविला. ते दस्तऐवज रद्द करून देण्यास तयार आहेत व रेसिडेंट साहेबांकडेसच प्रकरणा सोबत ते दस्तऐवज गेलेले आहेत सबब ते परत देण्यासाठीं त्याजकडे न पाठवितां एकदम त्यांस सस्पेंडीचा हुकूम दिला, हा थोडा दुर्लक्षचा होय असें आह्मांस वाटतें; कारण इसम मजकुराचे हातीं दस्तऐवजच नाहींत तर त्याने त्याचा विनियोग कसा करावा! असतु दस्तऐवज हैदराबादेहून परत येण्यास किती दिवस लागतात व त्यांची सस्पेंडी केव्हां उठते ते पाहवें. नुकसान आले ह्मणजे चोहोंकडून येतें.

—ooo—

मि० डनलप साहेब असिस्टंट कमिशनर यांस कापूस खात्याचे काम विशेष पडूं लागलें आहे सबब त्याबद्दल कांहीं अधिक मिळावें ह्मणून त्यांनीं वरिष्ठाकडे विच्यारिलें होतें; परंतु तिकडून त्यांच्या इच्छेनुरूप त्यांस कांहीं जबाब मिळाला नाहीं असें ऐकतो- त्यांस असिस्टंट कमिशनरच्या वर्गांत घेतलें व ओघाप्रमाणें बढतीचे मार्गांत आणिलें हाच त्यांस फायदा होय असें वरिष्ट सरकारचें ह्मणणें आहे.

—ooo—

शिगांवास एक कापसाची व्यागन जळाली. तींत ३८ गठ्ठे होते.

—ooo—

यवतमाळचे पोलिस इन्स्पेक्टर मि० बालथ्या मरण पावले त्यांचे जागेवर चिखलीचे पोलिस इन्स्पेकटर रा. रा. कृष्णराव सखाराम यांस १२५ रुपये पगारावर कायम नेमिले. कृष्णराव हे गृहस्थ हुशार असून मागे यांचे विनाकारण २५ रुपये नुकसान झालें होतें तें आतां भरून मिळालें याबद्दल आह्मास संतोष वाटतो. आतां चिखलीचे आक्टिंग पोलिस इन्स्पेक्टर मि० करीमखान हे कायम होतील व तसें होणें योग्य आहे असें आह्मास वाटते.

—ooo—

रा. रा. एकनाथ मोरेश्वर कान्हेरे माजी तहशिलदार यांस अकोल्यास डिपुटी कमिशनर आफिसांत ७० रुपये पगाराची डिपुटी क्लार्क आफ धि कोर्टची जागा दिली असें कळतें. आता ते ती पत्करतात किंवा नाहीं पहावें.

—ooo—

उमरावतीस येत्या शुक्रवारी वक्तृत्वोत्तेजक सभेचा समारंभ सुरूं होणार आहे. उमेद्वार उमरावतीचे १० व अकोल्याचे २ आहेत असें समजतें.

—ooo—

ईस्टर हाली डे नावाचा युरोपियन लोकांचा सण आला आहे त्याकरितां दुसरे तारखेपासून ७वे तारखेपर्यंत हुजूर खजिने व दिवाणी कामें बंद आहेत.

पोलिसपट्टीचे बाबदींत विच्यार करण्याकरितां गेल्या सोमवारीं जनरल कमिटी भरली होती तींत पुष्कळ विच्यार होऊन कित्येक लोकांचे कर मे० बेल साहेब यांणीं स्वसंमतें कमी केले. तरी कांहीं लोकांवर पट्टी ज्यास्त बसली असा बोभाटा आहेच. पण आम्ही ह्मणतो कीं, २५ लोकांवरचा कर कमी होऊन एकदोन लोकांवर जास्त झाला तर ती गोष्ट तितकी गवगव्याची ह्मणण्यासारखी नाहीं असें आह्मास वाटतें.

—ooo—

आह्मास असें समजलें आहे कीं, मलकापुरचे वकील रा. रा. गोविंदराव हरि हे व्यापार करितात अशा सबबेने त्यांची सनद रेसिडेंट साहेबांनीं रद्द केली.

—ooo—

अकोटचे तहशिलदार मि० मार्देवर दिनसाजी यांचे बंधू हैद्राबादेहून नबाब यांजबरोबर आले आहेत त्यांस भेटण्याकरितां आले होते ते परत गेले. हे तरुण गृहस्थ हुशार असून काम फार चांगल्या रीतीने करितात असें समजते.

हैद्राबादेहून आलेले नबाब खुरशीदजा बहादर सी. सी. एस. आय. बिकर उल उमराव बहादर यांचे चिरंजीव हे सरदार ब्रह्मणपुराकडून येऊन थेट नागपुरास गेले होते तेथून उमरावतीस व अकोल्यास येऊन आतां अकोटाकडून नरनाळा किल्ला

पहाण्याकरितां गेले आहेत. यांचा बेत विशेष स्थळें पहाण्याचाच दिसतो. सरकार संबंधाचा काय असेल तो कळत नाहीं. उमरावतीस गेले होते तर कमिशनर साहेबांसही भेटले नाहींत असे समजतें

---

मि० इलिएट साहेब येथील एज्युकेशनल इन्स्पेक्टर २ महिन्याची रजा घेऊन १ल्या तारखेस माथेरानास गेले.

---

येथील नार्मलस्कुलचे प्रिन्सिपाल रा० रा० वामनराव प्रभाकर परांजपे हे तीन महिन्याचे रजेवर गेले होते ते तारीख १ एप्रिल रोजीं येऊन त्यानीं आपले कामाचा च्यार्ज घेतला. व मि० नूरखान उमरावती हाय स्कुलांतील हिंदुस्थानी मास्तर येथें आक्टिंग प्रिंसिपाल होते ते तारीख ३ रोजीं उमरावतीस गेले.

येथील नार्मल स्कूलचे हिंदुस्थानी मास्तर वरील वर्गावर्गीत उमरावती हायस्कुलांत गेले होते ते आतां परत आपले जागेवर येतील.

---

मूर्तिजापुराहून आह्मांला एक पत्र आलें आहे त्यावरून कळतें कीं, तिकडील पाटिल पटवारी व जागले लोकांस बनातीचे दरेस दिले आहेत. व ते पहाण्या करितां असिस्टंट कमिशनर आले होते.

---

जळगांवाहून आह्मांस एक पत्र आलें आहे त्यावरून कळतें कीं तेथें एक गाईस दोन वासरें झालीं.

जळगांवकर शेतकरी वगैरे लोक आतां नागपुरी लुगड्यांत विलायती सूत असते त्या योगानें तीं टिकत नाहींत आणि सहनाची शेंद्री व कासाई ह्या दोन जातीचीं लुगडीं होतात तो टिकत नाहींत आणि पैसा एक लुगड्याचे दिढीनें जातो याजकरितां जळगांव येथील कोष्ट्यानीं खात्रीचीं लुगडीं टिकाऊ, काठ चांगले. रंगांत उत्तम किंमत ६ रुपये पर्यंत घेऊन आपरूं लागले आहेत.

येथें देशी मालाचे दुकान काढावें. व इकडे खादा. वैरव वगैरे जातीचे कापड तूर्त जुने मागावर काढून परदेशांत पाठवित जावे आणि परदेशांतून जो माल देशी तयार होत चालला आहे तो आणऊन प्रचार सुरू करावा या कामास भांडवल वगैरे जमविण्याचे कामांत बरेच लोक लागले आहेत जागोजाग त्याचा बेत सुरू आहे बहुधा लवकरच हे दुकान बाहेर पडेल असें वाटते.

---

एक मुसाफर फत्तेखेलड्याहून लिहितो कीं तेथें रा० भिकाजी भगवंत नावाचे स्कुलमास्तर आहेत ते हुशार, मेहनती, व त्या स्कूलांत १२ वर्षें काम केले असून त्यास कोठें चांगली बढती अजून मिळत नाहीं. ही गोष्ट खरी असेल तर त्यांचे वरिष्ठ त्यांकडे लक्ष देतील असें आह्मी इच्छितो.

फत्तेखेलड्याचे चीफ कानस्टेबल शेख रहिमान यांची मलकापुरास बदली झाली व तेथील चंदनसिंग येथें आले.

शिरगांवांत एक साळ्याचा मुलगा ११ वर्षांचा तळ्यांत स्नानास गेला होता तो बुडून मरण पावला.

गावकऱ्यांनीं येथील गावठी शाळा मोडून सरकारी शाळेंत मुलें पाठविण्याचें मनावर घेतलें आहे.

महारांचीं ९ व मुसलमनांचीं ९ अशीं १० घरें यथें आगीनें जळालीं.

—०००—

वऱ्हाडांतील शाळाखात्याच्या सन १८७२।७३ सालच्या रिपोर्टावर तारीख ३१ मार्चच्या टा० इंडियांत कांहीं मजकूर छापला आहे. त्यांत मे० क्वाडी साहेब आक्टिंग डायरेक्टर यांणीं पुष्कळ गोष्टी चांगल्या केल्या व एकंदरींत रिपोर्ट चांगला असून विद्यावृद्धीही बरीच होत आहे असें लिहिलें आहे. ही गोष्ट कदाचित खरी असेल. पण आह्मास फार आश्चर्य वाटतें कीं या प्रांतांतील वर्तमानपत्रास रिपोर्टाची प्रत न दावितां दुसऱ्या इलाख्यांतील कांहीं वर्तमानपत्रास ती मिळून त्यांणीं आपले दिले. गेल्या सालीं आह्मास रिपोर्ट डायरेक्टर साहेबांनीं दिला होता पण यंदा त्याणीं कां अवकृपा केली हें समजत नाहीं.

## जाहिरनामा.

इलिचपुर येथील डिपुटी कमिशनरची जुनी कचेरी जीस खुनी बंगला असें ह्मणतात ती व त्यांतील घरें, जमीन, विहिरी झाडें, वगैरे सुद्धां तारीख १५ माहे मे सन १८७४ इसवी रोजीं उघड लिलावानें विकली जाईल ज्या कोणाची इच्छा सदर्हू इमारत खरेदी करण्याची असेल त्यानें डिपुटी कमिशनर इलिचपूर यांचे आफिसांत त्या इमारतीचा नकाशा पहाण्यास मागितला असतां त्यास मिळेल.

इलिचपुर तारीख ३१ मार्च<br>सन १८७४ इसवी

J. I. Bushby.<br>डिपुटी कमिशनर इलिचपुर.

---

NOTICE.

The Deputy Commissioner's old Kutcherry at Elichpur known as the "Khonie Bunglow" with its out houses, grounds, wells, trees & will be sold by public auction on 15 th May 1874. Intruding purchasers will be able to see the plan on aplication at the Office of the Deputy Commissioner at Elich.pur.

Elichpur<br>31 March 1874.

J. I. Bushby<br>Deputy Commissioner Elichpor District.

## वर्तमानसार.

श्रीधर विठ्ठल दाते यांची चौकशी नळगावास सुरू होती ती ईस्टरहालिडेच्या सणाकरितां ८वे तारखेपर्यंत तहकूब आहे. त्यांवर आणखीही कांहीं मोकदमे होणार आहेत. त्यांस एक महिना साधी कैद व २५० रुपये दंड झाला होता त्यावर अपिल करून त्याचा निकाल होईपर्यंत शिक्षा तकूब राहिली आहे. ते अपील बुधवारीं धुळ्यास चालणार होतें. काय निकाल झाला तो अजून समजला नाहीं.

ग्वाल्हेर येथील स्टेटसेक्रटरी यांस असा अर्ज केला कीं इंडिया कौन्सलमध्ये कांहीं व्यापारी लोक नेमावे. त्याविषयीं यांस अनुकूळ असा स्टेटसेक्रटरीनीं जबाब दिला ठीकच!

बंगाल्याकडे ३९३३०० मनुष्यें दुष्काळा निमित्त नविन काढलेल्या कामांच्या मजूरीवर पोट भरीत आहे.

रा० रा० गंगाधर विश्वनाथ गोखले पुण्याच्या स्माल्काज कोर्टाचे रजिस्टर यांस मुक्रर केलें.

रा० रा० खंडेराव चिमणराव बेदरकर यांस कच्छचे दिवाण नेमणार.

पुण्यास रा० रा० बाबागोखले, गंगाधर विष्णु लिमये व मि० राजन्ना लिंगु यांनीं वकिलीचीं कामें करण्याकरितां सनदा घेतल्या.

रा० रा० दामोदर भिकाजी जटार बी ए. यांस सातारच्या हायस्कूलचे हेड मास्तर नेमिल्याप्रमाणे ते कामावर जाऊन रुजू झाले.

सर जार्ज क्यांबेल तेरावे तारखेस विलायतेस जाणार व त्याचे जागीं सर रिचर्ड टेंपल बंगालचे लेफटनेन्ट गव्हरनर होणार. हे सन १८६७ इ० सालीं हैद्राबादेस रेसिडेंट होते तेव्हां त्यानीं वऱ्हाडचा कारभार हुशारीने केला.

हिंदुस्थान तर्फे विलायतेंत पार्लमेंटास मत सभासद असावे असें कित्येक निःपक्षपाती व परोपकारी साहेब लोकांस वाटूं लागले आहे.

लार्ड नार्थ ब्रूक येत्या पावसाळ्यांत विलायतेस जाणार व त्या जागीं सर बार्टल फ्रीयर यांची नेमणूक होणार अशी गप्प उठली आहे परंतु त्यास मुळींच कांहीं आधार नाहीं.

**मुंबईच्या मुसलमानांच्या दंग्याचा परिणाम**— मि. सुटर यांनीं सरकारास युरोपियन पोलिस व काळे स्वारांचे पोलिस वाढविण्याविषयीं सूचना केली ती सरकारास अर्थात आवडली. या लोकांस पगारा खेरीज राहण्यास जागाही पाहिजेत. आतां हे सर्व खर्चाचें प्रकरण मुंबई म्युनिसिपालिटीकडे येईल, तेव्हां मुंबईच्या लोकांनीं आपले मीठ जास्त तोडून या खर्चाची भर केली पाहिजे हे उघडच आहे. दुसऱ्याच्या अपराधाचें प्रायश्चित जर गोऱ्यास न पडेल तर मग न्याय तो काय? या दृष्टीनें पहातां कोणा एक पार्शानें आपल्या पैगंबरास दोष दिल्यामुळें मुसलमानांनीं बिचाऱ्या भलत्याच पारशास त्रास दिला हा देखील कांहीं अन्याय ह्मणतां येणार नाहीं.

पारसी लोकांना मुंबई सरकारापाशीं त्यानीं स्टेट सेक्रेटरीस पाठविलेल्या पत्राची व पोलिस कमिशनरच्या रिपोर्टाची नकल मागितली होती ती त्यांस न देतां जबर अर्थ टोचून लिहिला आहे.. हल्लीं हरएक कामांत सामान्य दृष्टीच्या मनुष्याच्याही लक्षांत असें येतें कीं, सरकारचे यंत्र नीच बिघडले आहे. जें जें काम चालतें त्यांत शहाणपणाची कमताई टळटळीत दिसून येते. सरकारी कामकाजामध्ये मुलांचा खेळ तऱ्याप्रमाणें हसणें व रागावणे अगदींउपयोगी नाहीं. आणि प्रस्तुत तर सगळा हसवाच दिसतो. प्रस्तुत विलायतेस प्रधानमंडळ बदलले आहे त्याच्या मनांत इकडे हल्लीं मानी अगर बदला बदल करण्यास या गोष्टी कारण होतील कीं काय अशी शंका येते.

इं. प्र.

**माकडाचें ज्ञान.** "फ्रकवर्नस गॅपली", नामक पत्रांत लिहिलें आहे कीं, वडाच्या झाडावर बसलेल्या कांहीं माकडां पैकीं एका साहेबानें एक खी जातीचें माकड मारून त्यास आपल्या तंबूंत नेल्याबरोबर सर्व माकडें तंबू सभोंवतालीं जमलीं व मोठ्यानीं गोंधळ करूं लागलीं. हें पाहून माकडें कदाचित् आपल्या आंगावर येतील अशा भीतीनें, साहेबानें त्यास बंदुक दाखवितांच, भीतीनें, एक पुढारी माकड खेरीज करून सर्व पळालीं. माकडें बंद पाहिल्याबरोबर कशीं भितात हें पुष्कळास माहीत असेल. पळून न जातां धैर्यानें तंबूसमोर, उभें राहिलेलें पुरुष जातीचें माकड पाहून साहेबास दया आली व त्यावर त्यानें गोळी घातली नाहीं. परंतु त्यानें जावें ह्मणून साहेबानें दुसरे पुष्कळ उपाय केले परंतु तें माकड जाईना. अखेरीस माकड तंबूच्या दरवाजापाशीं येऊन दीनवाणे तोंड करून रडण्याच्या सुरानें ओरडूं लागलें. हें पाहून साहेबास दया आली व मारलेलें माकड त्याच्या स्वाधीन केलें तें माकडानें मोठ्या ममतेनें खांद्यावर घेऊन आपल्या सोबत्याकडे घेऊन गेला. हें पाहून माकड मारावयाचें नाहीं असा साहेबानीं निश्चय केला.

**कोश**—इंग्रजी व मराठी कोश मेजर क्याडी साहेब यांणीं तयार केलेला होता त्याची दुरुस्ती करून पुनः प्रती ६००० छापल्या आहेत.

एका फ्रेंच वर्तमान पत्रावरून समजतें कीं पारीस शहरांत कृत्रिमडोळ्याचा कारखाना इतका तडाक्याने चालला आहे कीं प्रत्येक आठवड्यास ४०० व दरवर्षास २०००० डोळ्यापेक्षां जास्त विक्री होते. यापैकीं बरेच डोळे हिंदुस्थान व ग्रांडब्रिटनास रवाना होतात. या डोळ्याचा हिंदुस्थानांत मूर्ती खेरीज दुसरा काय उपयोग होतो हें सांगवत नाहीं. आमच्या देशांत पुष्कळ मनुष्यांस एकच डोळा असून कित्येकास दोनीही डोळे नाहींत परंतु कृत्रिमा जोड्याचा कोणी उपयोग केल्याचें दिसत नाहीं.

मुंबई समाचारावरून कळतें कीं, माही नदीच्या कांठीं देहवन नांवाच्या गांवानजीक सुमारें एक कोस अंतरावर व्हेल जातीचा मासा सांपडला. लांबी ७० फूट व जाडी ८ फूट होती. कोळ्यानीं मासा मारून त्याच्या आंगांतील चर्बी काढून घेतली. व्हेल जातीचे मासे शीत कटिबंधातील समुद्रांत फार सांपडतात व शिकार करण्याकरितां विलायतेहून व युरोपखंडांतील इतर देशांतून दरसाल तारवें जातात. या माशास मारण्यास स्वल्प जावें ह्मणून इंग्लडांत एका गृहस्थानें नव्या तऱ्हेची तोफ काढली आहे. हे मासे धरण्यास मोठें उत्पन्न होतें. यांतून चरबी होते व हाडाच्या काठ्या वगैरे अनेक वस्तु होतात.

रा० रा० नानाभिडे यांचा खटला पुढच्या सेशनास निघणार असून वादी तर्फे काम चालविण्यास लीथ साहेब बालिष्टर यांस घेण्याची हायकोर्टानें परवानगी दिली आहे.

## लोखंडावर रुप्याचा मुलामा चढविण्याची रीति.

प्रथमतः लोखंडास कानशीनें अगर सफाई देण्याच्या कागदानें साफ घांसून, नंतर खालीं दर्शविल्याप्रमाणें त्यावर पारा चढवावा.

१२ भाग पारा, १ भाग जस्त.

१ भाग शिसाकस, २ भाग म्युरायटिक आसिड, आणि १२ भाग पाणी या सर्व जिनसा एका बंद मातीच्या भांड्यांत घालून चुलीवर ठेवून दोनशे अंशापर्यंत आंच लागू द्यावी. नंतर तें भांडें चुलीवरून काढून, आपण प्रथम जें लोखंड कानशीनें साफ केलें आहे, तें त्या भांड्यांत टाकावें; आणि थोड्या वेळानें काढावें. ह्मणजे त्याच्यावर पाऱ्याचे पुट बसेल. जर त्यावर पारा थोडा चढला असेल तर तें पुन्हा त्या भांड्यांत घालावें. ह्मणजे चांगला पारा बसेल.

ही कृति झाल्यावर सोनार लोक ज्या प्रमाणें रुप्याचा रस करतात त्याप्रमाणें करावा. व तो रस वर लिहिलेल्या पारा दिलेल्या लोखंडावर चढवावा; ह्मणजे लोखंडाचे स्वरूप जाऊन त्यास रुप्याचे येईल.

विलायतेंतील ग्लासगो शहरीं बंगाल्यातील दुष्काळाप्रीत्यर्थ १,००,००० रुपये जमा झाले.

आह्मांस कळविण्यास फार दुःख होतें कीं, मागच्या मंगळवारीं श्री० सगुणाबाई ऊर्फ आईसाहेब महाराज यांस देवाज्ञा झाली. सातारचे राजे श्री० आपासाहेब महाराज यांच्या पाठीमागें आईसाहेबांनीं, आपल्या, लहानशा वैभवाचा चांगला बंदोबस्त ठेवला होता. ने. ओ.

अनर्थ—आह्मांस लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं, सातारा येथील महाराज सरकारच्या रंगमहालास तारीख २६ मार्च रोजीं एकाएकी आग लागून सर्व इमारत खाक झाली!

निरनिराळ्या ठिकाणीं धान्य पाठविण्याकरितां बंगाल सरकारानें ७६,००० गाड्या १,७६००० बैल, आणी १,००,००० मनुष्यें कामास लाविलीं आहेत. ज्ञा. ग्वा.

## कल्पित नाटक.

स्थळ.

विश्वासरावांचा वाडा

पात्रें.

कावेरी............विश्वासरावांची स्त्री.

रेणुका ................एक शास्त्र्याची पत्नी.

विश्वासरावांची स्त्री सर्व गृहसंबंधी कामकाज आपल्या सुनेस करावयास सांगून आपण आपल्या मनाशीच विचार करिते कीं, ल्हानें थोर, घरधन्यास तर काहीं माहेरच्याशीं वाचून रहावत नाहीं. मी दररोज एकांतसमयीं उपदेश भाह्यानें होईल तितका करित असते पण पुन्हा तेच आहे. विवंचनेंत बसली आहे तों रेणुकाबाई कावेरी बाईच्या अतिप्रीतीतील मैत्रीण गृहसंबंधी कामकाज आटोपून कावेरी बाईकडे येते. तीस पाहून कावेरी बोलते.

कावेरी.—या बाई, कसंकाय, काम काज आटोपलें काय?

रेणुका—आटोपलं तर काय केव्हांच झालंच काय, श्रीमंतासारखा थोडाच थाट होय आहे. असें ह्मणून नथेचा हलकेंशी हीं गांठ त घरून कावेरीकडे पाहून तीस ह्मणते:—ताई साहेब, एक गोष्ट मी तुह्मांस विचारते, पण खरं सांगाल तर सांगते. पण हातावर हात द्या अगोदर.

कावेरी —बः इतकी गुह्य गोष्टती कसली विचारतां बाई? हातावर हात तो कशाला हावा? मी कांहीं दुसरी तिसरी आहे. आहो बाई मी तुह्माशीं कसची तरी गोष्ट लपविली आहे काय? असें असून हातावर हात तो कशाला हावा?

रेणुका—ते कांहीं नाहीं. पण हातावर हात द्या नां? तुमचं काय जातं?

कावेरी—(तिच्या हातावर हात मारून) काय ती गोष्ट बाहेर पडूंद्या एकदाची.

रेणुका—आज तोंड का उतरलेलं दिसतं? रावसाहेब कांहीं रागं भरले वाटतें.

कावेरी—चः काय मेली गुह्य गोष्ट ती. बाई, रागं भरणं होईल असें मी मुळींच करित नाहीं मग राग कां बरं भरेल होईल?

रेणुका—तर मग तोंड कां उतरलं?

कावेरी—सदोदित एकसारखी स्थिति रहात असते काय?

रेणुका—असं होणं महत्प्रयासाचे काम आहे. ईश्वरानं मनुष्यादिकांस उत्पन्न करून त्यांच्या त्यांच्या उद्योगानुरूप त्यांस सुखाचा आणि दुःखाचा वांटा मिळतो. सुखाचा वांटा दुःखाच्या वांट्याहून जरी दुप्पट किंवा त्याहून पुष्कळ अंशीं मोठा असेल तरी पण दुःखाच्या वांट्यापेक्षां सुखाचा वांटा ल्हानच दिसतो याबद्दल तुकाराम बुवांचेही वाक्य आहे तें असें "सुख पहातां जवा पाडे, दुःख पर्वता एवढें" या मानानें आपल्या सारख्यावर जरी दुःखाचा वांटा आला असेल तरी तो सुखापेक्षां मोठाच आहे. तर ताईसाहेब, मी विचारल्याचा जबाब द्या नां?

कावेरी—तुमच्याच बोलण्याचा भाव कीं, ज्यास सुख आहे त्यास दुःख आहेच. कांहीं दिवस सुखानें आनंदांत घालवावे आणि कांहीं दिवस दुःखांत कष्टानें घालवावे. आह्मासारखे श्रीमंत लोक जर दुःखाचा अनादर करतील तर अर्थांत गरीब लोकही करतीलच; कारण गरीब लोकांस दुःखांत फार वेळ घालवावा लागतो. तर आमच्या सारख्यानें दुःखाचा अनादर केला तर त्याचा स्वीकार तरी करावा कोणी?

रेणुका—पण स्वीकार तरी करण्याचं काय प्रयोजन?

[रेणुकाबाई असें बोलत आहे तों मित्रासारखा (आपाई मोहनाची हातांत निश्वासरावांचे दप्तर घेऊन येतो.)

रेणुका—अगोदर वचन घेतलंन आहे ह्मणून नं सांग नाहीं तर तुह्मी कशाच्या बाई दाद लागू देणार? आतां लवकर स्वारी रावसाहेब आल्याशी; पण उद्यां तरी सांगाल? मी येऊं आतां?

कावेरी—मी कधीं नाहीं ह्मटलें? पण बाई आल्या न आल्या कीं जसें मुंगळे लागतात. बसा, जाल मग.

रेणुका—चार वाजले. रावसाहेब आतां येतील. कोठवर तरी बसावं? इतका वेळ बसले, कांहींच कां नाहीं?

कावेरी—आले ह्मणून, कां रागं भरतील?

रेणुका—असं नव्हे पण आतां जाऊं बाई घरीं येण्याची वेळ झाली.

(कावेरी रेणुकाबाईस कुंकुम लावून वाटेस लाविते)

(पुढें चालू.)

## कायद्या संबंधीं माहिती

रेसिडेंट साहेबांचे पत्र नं० ३३११ ता० २४ नोव्हेंबर सन १८६८ इसवीचें व सेंट्रल प्राव्हिन्स ह्मणजे नागपूर प्रांतांतील वकीलांना फी मिळण्याचे जे नियम आहेत ते वऱ्हाडांतील वकीलांना लागू करण्याबद्दल.

नियम.

१ नागपूर प्रांतांत रेग्युलर मूळ दावे अथवा अपिलें चालविण्याचे बाबदींत पक्षकारांनीं वकील नेमून दिले असतां त्यांनां जी फी देवविल्यांत तिचा नियम खालीं लिहिल्याप्रमाणें.

पैशाच्या, माल मिळकतीच्या, व मुकसानीच्या मुकदम्यांत दाव्याच्या रकमेवर तीन रुपये शेकडा फी मिळावी. परंतु एका मुकदम्यांत (तो फार मोठा असेल तर) १००० रुपयांहून अधिक फी मिळूं नये.

२ हा हिशेब करितांना दाव्याच्या रकमेवर आणे पई असल्यास त्या सोडून देऊन करीत जावा.

३ वकील लोकांना याहून अधिक कांहीं देण्याची पक्षकारांची इच्छा असेल तर त्यानें पाहिजे तसें आपले वकिलाशीं करार करावे; परंतु मुकदम्यांत खर्च ह्मणून सदरीं सांगितल्याहून अधिक रक्कम कोर्टांतून देवविली जाणार नाहीं.

४ एका पक्षकाराचे तर्फे एकाहून अधिक वकील असतील तर एका वकिलाच्या फीचा मात्र आकार मुकदम्याच्या खर्चांत दाखल केला जाईल.

५ कोणी वकील पक्षकाराचे तर्फे कोर्टांत येऊन तो मुकदमा संपे पर्यंत त्याचें काम चालविणार नाहीं, गैरहजर राहील, अथवा दुसरा वकील येऊन तो मुकदमा चालवील तर पहिल्या वकिलाला फीचा भाग किती दिला पाहिजे हें कोर्टानें ठरवावें; आणि कोणते मुकदम्यांत वकिलाच्या गैर वर्तणुकेमुळें किंवा दुर्गुणांमुळें पक्षकाराचें काम चालले नाहीं असें कोर्टांस वाटेल तर वकिलास थोडी दखील फी देण्याची मना करण्यास कोर्ट मुखत्यार आहे. आणखी वकिलानें बुद्धया किंवा चालचुकपणामुळें आपले पक्षकाराचे कामाकडे दुर्लक्ष केलें व त्यामुळें त्याचें नुकसान झालें असें शाबीद होईल तर पक्षकारानें आपले वकिलावर नुकसान मागण्याचा दावा केला असतां तें नुकसानही त्यास भरून मिळेल.

६ वकील अगाऊ मुकदम्यांत नेमलेला असला तर सदरीं पहिल्या कलमांत लिहिलेले फींत पर्यंतच त्या मुकदम्याचे फैसल्याचे अमलबजावणीचे कामाबद्दलच्याही फीचा समावेश होतो असें समजावें.

७ इतर प्रकारच्या किरकोळ दाव्याचे वेळीं आणि हुकूमनाम्याचे अमलबजावणीचे अर्जाचे वेळीं पहिला वकील नसून नवा कोणी नेमला असेल तर सदरीं पहिले कलमांत लिहिलेल्या फीच्या चौथाई फी त्यास मिळेल. ता० १ जून सन १८६९

कमिशनर साहेबांचे जुडिशिअल सर्क्युलर नंबर ६ तारिख ३० मार्च सन १८६९

एका अडाणी व अक्षरशत्रु खेड्यानें आमचे कोर्टांत एक अर्ज दाखल केला त्यांत असें कळविलें आहे कीं, माल काढण्या देण्याबद्दल एका खेड्यावर हुकूमनामा जहाला असून त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरितां त्याचा माल जप्त केला गेला आहे.

सदर्हू मुकदम्यांतील कागदपत्र आणवून पाहिल्या नंतर आमच्या नजरेस असें आलें आहे कीं वादीनें कर्जरोख्यावरून फिर्याद केली असून त्या कर्जरोख्यावरून मतलब पहातां तो अर्जदारानें लिहून दिला असें दिसण्यांत येतें व मला हें कर्ज कबूल आहे अशी लेखी कबुलायत बाह्यात्कारी अर्जदारानें कोर्टांत हजर केली आहे असें दिसतें. आणि एवढ्या कबूल जाबावरून त्यावर एक हुकूमनामा झाला.

तथापि त्या खेड्यास आम्ही सवाल केल्यावरून त्यानें सांगितलें कीं, असा कधीं कर्जरोखा लिहून दिला नसून कोर्टापुढें लेखी कैफियत कधीं दाखल केलेली नाहीं हें त्याचें ह्मणणें खरें असेल अगर खोटें असेल परंतु कागदपत्रावरून असें दिसून येतें कीं, कर्जरोख्यावरील साक्षीदाराच्या जबान्या जुडिशिअल एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर साहेबांनीं घेतल्या नाहींत अगर ज्या मनुष्यानें सदर्हू लेखी कैफियत दाखल केली त्यास त्या कैफियतींतील मजकुराविषयीं विचारल्याचें स्पष्ट दिसून येत नाहीं. ज्यास लिहितां अगर वाचतां येत नाहीं अशा लोकांचे नावचे दस्तांविषयीं चौकशी न करितां ते दस्त त्यांचे उद्देश दाखविणारे पुरावे आहेत असें समजून ग्राह्य केल्यास किती धोका आहे. तें न्यायाधिकाऱ्यास दाखविण्याचा या सर्क्युलराचा इरादा आहे परंतु जेव्हां अशा रोख्यावर अज्ञानी खेड्याची कल्पित निशाणी मात्र असेल अथवा अर्जावर जेव्हां त्याणीं दिल्या असतील तरी ते रोखे व त्या अर्जावर त्याचे विरुद्ध साक्ष पुरावे होण्यास फार अपूर्ण आहेत कारण त्या दस्तैवजाचे मतलबाविषयीं आणि हेतुविषयीं त्यास कळविणें सोपें काम आहे.

यास्तव रोखा लिहून देणारा आणि त्या रोख्यावर असणारे साक्षीदार यांच्या जबान्या रोख्यांतील मजकुराविषयीं घेतल्यावाचून अज्ञानी मनुष्यानें लिहून दिलेले रोख्यावरून न्यायाधिशानें हुकूमनामा देऊं नये आणि जेव्हां अशा प्रकारच अज्ञानी लोक लेखी कैफियती दाखल करतील तेव्हां न्यायाधिशानें त्या कैफियतीवर असें सर्टिफिकिट लिहावें कीं, त्या कैफियतींतील हेतुविषयींची माहिती पक्षकारास आह्मी विचारून घेतली आहे.

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा.प.

REGISTERD NO 7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० १२ माहे एप्रिल सन १८७४ इ० अंक १५

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु |
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

हें औषध गजकरणावर चालून खरून नायटे यांवरही चालतें कि० .... ०६

### नोटिसा.

नोटिस—सोनाजी वलद विष्णाजी टोरे पाटील मौजे अळंद तालुके अकोले यास शिवाजी इंद्राजी पाटील साहू दुकान वटवाडी वहिवाटदार सखाराम पाटील यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे पुरावरून १०० रुपये मुद्दल व सुमार दोन वर्षांचें व्याज घेणें आहे त्याजबद्दल तुह्माला तगादा केला तेव्हां तुह्मी ह्मणाला कीं आपचे आत्याचें वावर आहे ते पाच वर्षें आपले ताब्यांत ध्यावे आह्मी ह्मणालो कीं त्याचा राजीनामा देऊन आमचे नावावर करून द्यावे ती गोष्ट तुह्मी कबूल केली नाहीं व आमचे रुपयेही दिले नाहींत त्यावरून तुह्मास मुद्दाम ही नोटिस देऊन कळवितो कीं नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत सदरहू आत्याचें वावर आमचे नावे करून द्यावे नाहींपेक्षा तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून फैसला मिळविला जाईल व त्याचे आणि खर्चाचे रकमेत तुमचें आखरा चें आणि काळीचें अशीं दोन्ही वावरें हरास करून घेतलीं जातील. कळावे तारीख ६ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

(सही) शिवाजी इंद्राजी पाटील मौजे वटवाडी वहिवाटदार सखाराम पाटील दस्तुर खुद्द

---

नोटिस—रुमाजी वलद उद्धेभानजी माळकर मौजे निंबी तालुके अकोले यांस शिवाजी वलद इंद्राजी पाटील साहू दुकान वटवाडी यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडून पुर्जावद्दल रुपये १०० व खातेबाकीबद्दल रुपये ९० व खांदावद्दल रुपये ३० व ज्वारी मण १० शिवाय दोन वर्षांचें व्याज घेणें आहे. त्याजबद्दल दोन तीन वेळा तुह्माला मागणें केलें असता तुह्मी ह्मणता कीं आह्मी एक पैशाचेंही देणार नाहीं. अशी दंडेली उपयोगी नाहीं. रुपयांस दोन वर्षें झालीं न जवारी तर मुद्दत पैकीं आहे असे असतां तुह्मी नाकबूल जाता ही भलेपणाची रीत नाहीं. याजकरितां तुह्माला एक महिन्याची मुदत देऊन या नोटिशीनें कळवितो कीं, तुह्मी चांगला पंक्त विचार करून आमचे रकमेचा उलगडा करावा व तुह्माजवळ रोख रकम नसल्यास हिशेब करून रकम ठरवून एकंदर पुर्जा करून द्यावा. व याप्रमाणें एक महिन्यांत तुह्मी केलें नाहीं तर तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां सर्व रकम भरून घेतली जाईल. कळावे तारीख ६ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

(सही) शिवाजी इंद्राजी पाटील साहू दुकान वटवाडी दस्तुर सखारामजी.

---

नोटिस—रामा वलद कृष्णा चांभोर वस्ती कुटासे प्रांत दहिहंडे यास उत्तमचंद नथमल दुकान कुटासे यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे दुकानची बाकी तुमचेकडे आहे तिच्या भितांनें तुह्मी व्यंकटराव वलद शहाजी देशमुख कुटासेकर यांस ताबेगहाणखत लिहून दिलें आहे व हल्लीं आह्मी तुमचेवर अडगांव कोर्टांत दोन दावे रुपये ४००चे केले ते समयीं तुह्मी विनाकारण खोटी तक्रार सांगून मुकद्दमा लांबविला. तथापी कोर्टांत चौकशी होऊन आमचे तर्फे फैसल जाले. शिवाय आमची बाकी मुद्दल ८०० शिवाय दोन वर्षांचें व्याज घेणें आहे. ते बुडविण्याचे इरादानें तुह्मी आपले जमिनीचें खरेदीखत करून देणार असे आह्मास परभारें समजते यास्तव तुह्मास कळविण्यांत येते कीं जर वास्तवीक विक्री करण्याचा इरादा तुमचा असल्यास हकूमनामा व खाते बाकीसुद्धां व्याज खर्च सहीत आमची बाकी आजमासें १३०० रुपये निघते तितका तुह्मी हिशेब करून एकंदर बाकीत तुह्मी आपली शेतें आह्मास खरेदी लिहून द्यावीं. जर तुह्मी विक्री करीत नसाल तर हुकूमनाम्याकरितां आह्मी शेतें जप्त केलीं आहेत त्या हुकूमनाम्याची फेड झाल्यावर बाकीचे खातेबाकींत शेतें गहाण लिहून देऊन दोन तीन वर्षांत रुपये फेडण्याची तजवीज करावी. उगीच लोकांचे नादी लागून बुडू नये असे आह्मी इच्छितो जर कदाचित शेतें विकण्याचें तुह्मा मनांत आणाल तर दुसरे लोक ज्या किमतीस मागतील त्या किंमतीस आह्मी आपले बाकींत घेण्यास राजी आहों. इतक्यावर तुह्मी आमचे पश्चात विक्री कराल तर ती कपटाची समजून काम चालविलें जाईल. कळावें तारीख ८ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

( सही ) उत्तमचंद नथमल दुकान कुटासे दस्तुर खुद्द.

### पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० व० स० कर्ते यांस.

वि० वि० महाराज ह्या जगतामध्यें लोकांचे स्वभाव निरनिराळ्या तऱ्हेने असतात. कित्येकांना असें वाटतें कीं, आपलें हित न झालें तर न होवो परंतु आपल्या देशाचें, मित्रांचे व बांधवांचे हित व्हावें अशा प्रकारच्या मनुष्यास देवाची उपमा देणें योग्य आहे व ते ईश्वराप्रमाणें पूज्य होत. कित्येकांचा स्वभाव असा असतो कीं, आपलें हित साधून दुसऱ्यांचे हित करण्यास ते झटतात अशा मनुष्यास नराची उपमा योग्य होय. कित्येकांचा स्वभाव असा असतो कीं त्या स्वभावामुळें त्यांचे दर्शन सर्व लोकांस अप्रिय असतें. तो स्वभाव हा कीं, आपलें हित मुळींच जरी नसलें तरी दुसऱ्याचें अहित करणें हें त्यास मोठें भूषण वाटतें अशा मनुष्यास राक्षसाची उपमा देणें योग्य होय व अशा मनुष्यांची समृद्धि ह्या कलियुगात फारच झाली आहे. ह्मणून ह्या युगास राक्षसी युग ह्मटलें तरी काहीं चिंता नाहीं. ह्या राक्षसी युगामध्यें जे काहीं थोडे उरलेले साधु आहेत त्यांचा निभाव लागणें कठीण. असतु हें पत्र लिहिण्याचें कारण पुढील गोष्ट दाखवील. मला एक मित्र आहे त्याला, मित्र हा शब्द साजतो. त्याच्या एका सोबत्यानें त्याला अशा रीतीनें फसविलें कीं तो प्रकार लिहिण्यास वेळेनी कमतरता व दुःखाचे उद्गार ही माझी लेखणी चालूं देत नाहींत. एडिटरराव त्या माझे मित्राचे बोलण्याप्रमाणें ह्या हिंदुस्थानांत हजार लोक एक ठिकाणीं जमले ह्मणजे आपल्या मातेचा ( हिंदुस्थान देशाचा ) खरोखर ते दुष्ट निशाचर यमस्वरूपी लोक नाश करतील ही गोष्ट लक्षांत येऊन माझे मन कंपित होते. आतां पत्र विस्तार न व्हावा ह्मणून थोडक्यातच माझे मित्रांस असें सांगतों कीं मित्र ह्मणविणारे दुष्ट लांडग्याप्रमाणें राक्षस स्वरूपी लोकांपासून त्यांनीं दूर रहावें असें झालें ह्मणजे अर्थातच त्यांचें कल्याण होईल. असो वेळ फार झाला माफी मागतों, कळावें हे विनंती

' मित्रहितेच्छु'

---

रा० रा० व० स० कर्ते यांस.

वि० वि० पूर्वीं वऱ्हाड निजाम सरकारचे ताब्यात असतेवेळेस कोणते कोणते शिक्याचे रुपये चालत होते. याबद्दल जी माहिती आह्मास मिळाली आहे ती आपणाकडेस प्रसिद्ध होण्याकरितां पाठविली आहे. तरी योग्य दिसल्यास येत्या अंकात तीस जागा द्यावी.

वऱ्हाड निजाम सरकारचे ताब्यांत असते वेळेस खालीं लिहिलेले शिक्के चालत होते.

१ चांदवडी शिक्का तुरा.
१ चलनी शिक्का समशेरी.
१ सूरती.
१ सुरती मुंदरशाचा.
१ गोविंदबक्षी.
१ नागपूर.
१ चंद्रपुरी.
१ पिंपळनेरी.
१ नारायणपेठ.
१ आलफुलकर शिका चलनी.
१ मुलमटकी शिका चलनी.
१ विस्तमशाई वर फुली.
१ इंदुरी वर मुदके.
१ हिंगोली शिका चलनी.
१ अरकाटी.
१ उमरावती.
१ बेलापुरी.
१ नोहारी शिका.
१ बाबाशाई.
१ फरसी.
१ कलमी गोल.
१ कलमी चौकटी.
१ भडोची.
१ पुनळी शिका.
१ मगळनेरीवर बाळबोधी अक्षरे.
१ उज्यनी.
१ जांतपुरी.
१ जयपुरी.
१ बिकानेरी.
२ अश्वशाई.
१ किसनगडी
१ तोका.
१ नथनी शिका चलनी.
१ सोनारी शिका चलनी खाटा.
१ कोठा शिका.
१ बुंदी शिका.
१ छोशिंदा वर करवत.
१ इटगा शिका.
१ सायपुर शिका आकारचें रवी.
१ विलाडी.
१ सालमशाई.
१ उदापुरी.
१ कुचगागन.
१ जरीपटका.
१ अंकुशी.
१ वाफगावी.
१ माधवगाव शाई.
१ माधवपुरी.
१ टिपूसुलतान.
१ काशाचा शिका वर मच्छाकार.
१ भोपाळ शिका.
१ ग्वालरी.
१ हाळकरी.
१ श्रीनगर हल्ली शिका.
१ कमगुढी शिका.
१ कचुरी शिका.
१ गदव शिका.
१ अंदानी शिका.
१ महदरगी शिका.
१ कलदार.
१ चिंचोटी.
१ जावी
१ अकलकोटी.
१ फरळ शिका.

——

६४

येणेप्रमाणे रुपये चालत होते या शिवाय आणखी काहीं शिक्के असतील परंतु

त्याचीं नावें मिळू सकलीं नाहींत. आपल्या वाचकांतून जर कोणास माहित असतील तर त्यांणी मेहेरबानगीनें दावीत कळावें.

एक मुशाफर

---

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस —

वि. वि. आम्हीं मुंबई, पुणे, ठाणे वगैरे वर्तमानपत्रांचीं ठिकाणें सोडून आपणाकडे हाच पहिला प्रसंग ठेवून, खालीं लिहिल्या दोन ओळी, वाचकांसमोर दळढळीत प्रदान्या ह्मणोन पाठविल्या आहेत. तरी कृपा करून, नगमान्य वऱ्हाडसमाचार नांवाच्या रत्नमालिकेंत प्रसिद्ध व्हाव्यात.

मी फिरत, व ठैल करित ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरास पोचलों. शहर लहान पण मोठें टुमदार आहे. गांवांत हौदाचें मिठें पाणी आहे. शहरची म्युनसिपालिटी आहे. तिचेकडोन शहरात नवे हौद होत आहेत. परंतु, त्यांचीं कामें फार कच्चीं आहेत. आणि सर्व खर्चही अव्यवस्थित होत आहे अशा उघड गोष्टीवर येथील मेंबरांचे मुळींच लक्ष नाहीं ही अजीयब गोष्ट आहे.

सदरील ठिकाणीं [भिवंडी] बाळाजी शिवराम परांजपे यांचे जनरल प्रायव्हेट स्कूल आहे. मुलांची संख्या ६८ आहे. आणि ह्या स्कुलाचे मास्तर इतके हुशार आहेत कीं, असे गृहस्थ माझे पहाण्यांत थोडेच आले असतील. ज्यांचे नवळ मराठी, गुजराथी, मुसलमानी आणि थोडें इंग्लिश मिळून चार कलमी तलवारीप्रमाणें तेलंदार असून उत्तम चित्रें काढणें व पागोटीं बांधणें वगैरे कित्येक गुण आहेत. सारांश अशा गुणी पुरुषास १०० रुपये महिन्याची जागा सहज असावी परंतु अंधेरांत दाद लागणार कोठून !!! ह्मणून एडिटर साहेब, आपण तरी कोणी जहागिरदार किंवा संस्थानिक सरदार अगर जिकडे सूर्याचा पूर्ण प्रकाश आहे तिकडे सूचना करा. कारण ज्यास विद्यावृद्धी व्हावी अशी आवड, व त्या कामीं शिकस्त खटपट करणारे, किंबहुना प्रायः] शागीर्द (शिष्य) ह्यांचे नवळ तयार झाल्याशिवाय राहिलेच नाहींत. इतकेच नाहीं तर शिक्षण देणें असे शोधिल्यानेंही मिळणार नाहीं. महाराज, पत्रविस्ताराची माफी असावी. कळावें.

एक शा

---

# वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ११ शके १७९६

---

## जळगावास सुताची व कापडाची गिरणी.

आमच्या वऱ्हाडच्या नजीकचा प्रांत खानदेश आहे. त्यांतही आमच्या देशाप्रमाणेंच कापुस चांगला पिकतो. व त्याचे गठ्ठे दाबून विलायतेस पाठविण्याचे सोयीकरितां पुष्कळ वर्षांपासून युरोपियन लोकांनीं कित्येक फुलप्रेस तेथें मांडलेले आहेत. व त्यांच्या योगें ते त्या देशातील कापसाचें हरण करित आहेत. हें आमचे वाचकांस ठाऊक असेलच. परंतु आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, तेथें मुंबईच्या एका नेटिव व्यापारी कंपनीनें सूत काढण्याच्या व कापड विणण्याच्या कारखान्याची उभारणी केली आहे. तिजविषयीं थोडीशी हकीकत आह्मांस समजली आहे ती आमचे वाचकांकरितां आह्मी येथें लिहितो:—

मुंबईस सुंदरदास मुळजी या नावाची अशा प्रकारच्या कारखान्यांची एक कंपनी आहे. तिनें मुंबई बाहेर जेथें कापुस उत्पन्न होतो तेथेंच त्याचें सुत काढण्याचीं व कापड विणण्याचीं यंत्रें ठेविलीं असतां कंपनीला व लोकांनां अधिक फायदेशीर होईल हे मनांत आणून सोलापूर, मद्रास, व जळगाव अशा तीन ठिकाणीं कापड विणण्याचीं यंत्रें मांडण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें कामें सुरू केलीं आहेत असे कळते. त्याप्रमाणें जळगावास सदरहु कारखान्याकरितां इमारत बांधण्याचें काम सुरू होऊन सुमार ६ महिने झाले आहेत. हल्लीं तेथे ४० सुतार, ६५ गंवडी व सुमार ४०० मजूर मोठे झपाट्यानें काम करित आहेत. त्यांवर एक युरोपियन इंजिनिअर आहे. एक मोठें तळें खोदले त्यास पाणी लागलें आहे. इमारतीचें कामही दगडी, लांकडी वगैरे पुरें होत आलें आहे यंत्राचे कांहीं भाग जळगावास येऊन दाखल झाले आहेत व बाकीचे मुंबईस आले आहेत. त्या घराची वास्तुशांती लवकरच होणार आहे व ती झाली ह्मणजे लागलीच कारखाना सुरू होईल. या कारखान्याकरितां ७ लक्ष रुपये भांडवल योजिले आहे व त्यांतील निम्मी रक्कम इमारतीस व निम्मी यांत्रीक कामास लावण्याचा विचार आहे असे समजते.

ही जळगावांत फार उत्तम सोय निघाली असे आमच्या वऱ्हाडाला एखादें तरी यंत्र पाहिजे आहे. व ते करण्याविषयीं ईश्वर कोणाच्या मनास प्रेरणा करितो तें पाहावें. वऱ्हाडात कापुस दाबण्याचे फुलप्रेस जागो जाग झालेले आहेत व त्यांतून लाखो रुपयांच्या गठड्या तयार होऊन विलायतेस जातात. परंतु इकडे ईश्वरकृपेनें एकादें तरी कापड विणण्याचें यंत्र झाल्यास शेकडा एक दोन रुपयाचा माल तरी स्वदेशांत तयार होईल व तो पुढील लोकांस उदाहरणादाखल होईल. वास्तव कापडाचें यंत्र निदान सूत काढण्याचें तरी यंत्र वऱ्हाडांत स्थापील तर त्याचे आमच्या देशांवर मोठे उपकार होतील. ठोकळ अनुमानास असा समजला आहे कीं, वऱ्हाडांत देशी कापडाकरितां प्रतिवर्षीं सुमार ८ लक्ष रुपयांचें सूत लागतें व ते इकडून विलायतेस कापूस जाऊन त्याचें तिकडील व्यापाऱ्यांकडून सूत तयार होऊन येतें. याजकरितां उमरावती व खामगावचे मोठमोठाले व्यापारी इतर व्यापाऱ्यांशीं सल्ला मसलत करून भागीदारीनें असा एकादा कारखाना उभारितील तर त्यात त्यांना फायदा होऊन देशाची संपत्ती वाढेल. हल्लीं उमरावती व खामगांव येथील असा बोभाटा ऐकण्यांत येतो कीं, कापसाचा बहुतेक सर्व व्यापार युरोपियन कंपन्यांनीं आपले हातांत घेऊन नेटिव सावकारांच्या तोंडास पानें पुसलीं आहेत. व तें स्वतंत्रतेनें शेतकरी लोकांपासूनच माल घेत आहेत. तर या गोष्टीचा इकडील व्यापाऱ्यांनीं अवश्य विचार केला पाहिजे. स्वस्थ बसून उपयोग नाहीं असें आह्मास वाटतें. याविषयीं आणखी लवकरच आम्ही कांहीं लिहिणार आहों ह्मणून प्रस्तुत पुरें करितो.

---

## देशसुधारणुकीचें नवीन कीर्तन.

(लिहून आलेला मजकूर.)

ही आपली आर्य जननी हिचा पूर्वीं, काय डामडौल असे, हिच्या सेवेंत इतर लोक तत्पर असत; तशीच ही श्रीमान असल्यामुळें इतर राजे रजवाडे हिच्या जवळील द्रव्य आपणास मिळावे ह्मणून देवाची आराधना करीत; तशीच हिचीं बालकें पूर्वीं मोठीं हुशार, कारागीर, आणि चाणाक्ष अशी असत. अशा प्रकारच्या अनेक वैभवांनीं ही युक्त असतां वर सांगितलेल्या प्रकारचीं व याशिवाय स्वातंत्र्यादि अनेक एकदम जाऊन ही आपली वृद्ध माता आर्यजननी जे पूर्वीं हिच्या वैभवाचे फारच थोरवीनें वर्णन करीत त्यांच्या मुखाकडे परतंत्र होऊन म्लानवदनें पाहूं लागली. हर हर !!! "कर्मणो गहनो गतिः" क्षणांत रावाचा रंक आणि रंकाचा राव होण्यास विलंब लागत नाहीं.

देशबांधवानो; अशा कठीण प्रसंग आपल्या कृपाळू वृद्ध मातेवर गुदरला असतां आपण मजा पहात परकियांचे दास्य त्यांतच सर्वकाल घालवावा हे उचित दिसतेंना? आपल्यासारखे वर ह्या आपल्या जननीकडे दयार्द्रदृष्टीनें न पहातील तर कोण बरें पहाणार आहे? असतु.

वर सांगितलेली आपल्या आर्यजननीची स्थिति पाहून कित्येक कृपाळू देशबांधव या कृत्याकडे पूर्णपणें झटताहेत हें पाहून महदानंद होतो. देशीमाल नवीन नवीन तयार करण्याच्या बाबतींत देश हितेच्छु लोकांचा बहूत प्रकारें वेळ जातो, ह्यांत रानडे यांच्या आगपेट्या तर लेख्यापाड्या नही प्रसिद्ध झाल्या. परंतु मनसारख्यास देशसुधारणुकीपासून काय फायदा आहे हें कळत नव्हतें हे जाणून व कीर्तनद्वारा देशसुधारण्याविषयीं लोकांच्या मनांत पूर्णपणें उपदेश ठसेल कसें जाणून सातारा, मुंबई, पुणे, धुळे इत्यादी ठिकाणीं कीर्तनें झालीं व होतही आहेत. यामुळें आतां सर्वांचीं मनें देशसुधारण्याकडे लागतील यांत संशय नाहीं.

x वर सांगितलेलीं ठिकाणें ( मुंबई, पुणे, सातारा, धुळे )या शहरांत कीर्तनें होऊन तेथल्या लोकांचीं मनें देशाचे हीत करण्याकडे लागलीं. याचें फारसें आश्चर्य नाहीं कारण शहरांत बहुतकरून लोक विचारवंत असतात त्यांस थोडा सुबोध झाला कीं पुरे, लागलींच त्यांचीं मतें बदलून जातात तसें खेड्यातील अथवा सामान्य गावांतील लोकांचे नाहीं, त्यांचीं मतें लवकरच बदलत नाहींत. असें जाणून आमच्या पिंपळनेरास नवीन वरणगांवांहून बदलून आलेले लोकप्रिय मास्तर राजमान्य राजश्री वासुदेव रामचंद्र गोहनी पैठणकर यांणीं चैत्र वद्य ४स रविवारीं संध्याकाळचे ६ वाजल्यापासून ८ पर्यंत ३ तास आपल्या देशाची पूर्वींची आणि हल्लींची स्थिति या विषयावर सुरस कीर्तन श्रीगणेशमंदिरांत केलें. श्रोत्यांची संख्या १२५ शावर होती.

हरदास बुवांनीं मी पूर्वीं कधीं कीर्तन केलें नसून मला सूरतालाचें ज्ञान नाहीं ह्मणून श्रोत्यांस विनंती केली. तरी पण नवीनच हे हरदास बनल्यामुळें त्यांच्या मागच्या मंडळीचें व त्यांचें गाण्याविषयीं कोणत्याही प्रकारें न्यून पडलें नाहीं. बुवांनीं प्रथमतः वेदांत विषयावर थोडेसें संभाषण करून मग वर लिहिलेल्या अनुसंधानास आरंभ केला.

हरदासबुवास स्वतः कविता करण्याचें चांगले ज्ञान असल्यामुळें सर्व कथेच्या विषयांवर त्याच्याच कविता होत्या. हरदासास मागच्या मंडळीची चांगली मदत पाहिजे तीही यांस सर्वोत्कृष्ट होती. शिवराम जोशी या नावाचे यांचे मित्र यांस गाण्याच्या विषयांत माहा असल्यामुळें यांचे गाण्याच्या बाबदींत कांहींच उणें पडलें नाहीं. अशा प्रकारच्या कीर्तनाच्या थाटास मामलेदार कचेरींतील सर्व सरकारी मंडळीही आली होती.

आतां मास्तर साहेबांस हेच सांगणें आहे कीं, त्यांनी हा सदुद्योग न सोडतां आह्मा सारख्यांस वारंवार सुबोध करावा.

आतां यांच्या एकाच कीर्तनानें गांवांतील लोकांचीं मनें देश सुधारण्याकडे लागलीं असे नाहीं तर यांनीं आणखी या कृत्यांत आपला वेळ घालविला असतां त्यांचा वेळ फुकट न जाऊन एका कार्यांत मोठीं दोन कार्यें होतील तस्मात् मी केलेल्या विनंतीकडे वासुदेवपंत लक्ष देतील ही आशा आहे.

---

## वऱ्हाड.

मेजर बेल साहेब यांस आफिशियेटिंग जुडिशियल कमिशनर नेमल्या विषयीं रेसिडेंट साहेबाकडून तारायंत्रानें बातमी आली आहे.

—000—

क्याप्टन फिटझरल्ड साहेब वाशिमाहून अकोल्यास असिस्टंट कमिशनरचे कामावर येणार होते परंतु इतक्यांत अकोल्याची डिपुटी कमिशनरची जागा रिकामी झाल्यामुळें क्या० मेकंजी साहेब यांचीच नेमणूक अकोल्यास केली. व त्याप्रमाणें परवाचे दिवशीं ते येथें येऊन कामावर रुजु झाले. व फिटझरल्ड साहेब इकडे येण्याचा बेत रहित झाला.

—000—

येथील पेपरकरेन्सी खातें ह्मणजे नोटिचें आफिस उमरावतीस जाणार ह्मणून बातमी होती परंतु तें जाऊ नये ह्मणून रेसिडेंट साहेबाचा हुकूम आला असें कळतें. त्यावरून आमचे लोकप्रिय मि० डेवीस साहेबही येथून जाणार नाहींत. हे ऐकून आह्मांस संतोष होतो.

ता० ४ एप्रिलचे हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत खालीं लिहिलेल्या नेमणुका प्रसिद्ध झाल्या आहेत.

क्या० आर. एच. हडलस्टन थर्ड क्लास डे० कमिशनर यांस सेकंड क्लास डे० कमिशनर केलें.

मि० हार्डने फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर यांस थर्डक्लास डे० कमिशनर केले.

क्या० आर. बुलक सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर यांस फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर केले.

मि० मद्दिमनजी जामासजी थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर केले.

मि० ए. एलियट आफिशिएटिंग थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस कायमचे थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर केले.

—ooo—

विद्याखात्याचे डायरेक्टर, पोलिस खात्याचे इन्स्पेक्टर जनरल, व आरोग्य खात्याचे स्यानिटरी कमिशनर यांचा रेसिडेंट साहेबाशी पत्रव्यवहार स्वतंत्रतेनें होत होता तो आतां कमिशनर साहेबाशी होत जावा असे ठरवून तीं खातीं रेसिडेंट साहेबानीं त्यांचे ताब्यांत दिलीं. व त्याचप्रमाणें रेजिस्टर खातें जुडिशियल कमिशनरचे हाताखालीं ठेविलें.

—ooo—

रेसिडेन्सी आर्डरमध्यें हिंदुस्थान सरकारचा ठराव प्रसिद्ध झाला आहे कीं सनदी सिविल सर्व्हंट व सिविल खात्यांत काम करणार लष्करी कामदार आणि सनदी किंवा कमिशंड आफिसरांस जीं साधारण सिविल कामें मिळत असतात त्या कामावर असलेले सर्व लोक यांनीं त्या त्या प्रांतीं तूर्ततूर्त किंवा कायमच्या ठरावानें जमिनी संपादन करूनयेत किंवा वाळगुंनयेत.

—ooo—

खामगावच्या म्युनिसिपालिटीकडे खालीं लिहिलेले गृहस्थ गेल्या महिन्याचे ११ वे तारखेस मेंबर नेमिले.

- मि० डोर साहेब ग्रहाम कंपनीकडील
- ,, अंडरसन मुंबई ब्यांकेचे एजंट
- ,, जानराव देशमुख
- ,, वामनराव वकील
- ,, बिलंदखान अबकारी मक्तेदार
- ,, पुरणमल सावकार
- ,, गणेशदास भट्टर
- ,, बाळाजी नारायण

———

कायमचे जुडिशियल कमिशनर लेफटिनेंट करनल जे. अल्लाईस साहेब हे विलायतच्या आजारीपणाच्या रजेच्या प्रयत्नासाठीं मुंबईस गेले आहेत त्यांस रजा मिळाल्याचें अजून कांहीं समजलें नाहीं. तयारीकरितां ३० दिवसांची त्यांस रजा दिल्याविषयींचा रेसिडेन्सी आर्डरमध्यें हुकूम प्रसिद्ध झाला आहे.

—ooo—

मि० दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब असिस्टंट कमिशनर फेब्रुवारी महिन्याचे २४वे तारखेस दोन महिन्यांचे रजेवर गेले त्यांचे बर्गावर्गींत क्या० रेनिक साहेब थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस आफिशियाटिंग सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर केले आहे.

—ooo—

उद्यापासून डिपुटी कमिशनर साहेबाची कचेरी उष्णकाळामुळें सकाळची भरू लागणार आहे.

———

उंमरावतीच्या वक्तृत्वोत्तेजक सभेचा समारंभ १०वे तारखेस होणार होता तो रहितहे जनत्याकरितां १६वी तारीख नेमिली गेली आहे. अकोल्याचेही विद्वान व देशहितेच्छु लोक सदरहू समारंभास जाउन तो साजरा करतील असें आह्मी इच्छितो.

—ooo—

मुंबई इलाख्यांत कोर्टफीचे स्टांप वेंडर लोकांनीं विकावे व त्याकरितां त्यांस कमिशन मिळावें असा ठराव झाल्याचें समजण्यांत आलें आहे; परंतु तो ठराव अजून वऱ्हाडास कां लागू केला नाहीं तें कळत नाहीं. मुंबई इलाख्यासारखी इकडेही वहिवाट होईल तर लोकांची सोय होऊन वेंडरलोकांस फायदा होईल.

—ooo—

टपालचीं टिकिटें ५ रूपयांचीं किंवा त्याहून अधिक किंमतीचीं सरकारांतून घेणारास दर रुपयास अर्धा आणा प्रमाणें वरताळा मागें मिळत असे. तो बालिकडे सरकारानें बंद केला होता पण पुन्हा विचार होऊन तो पूर्ववत्प्रमाणें सर्वांस मिळावा असा मुंबई इलाख्यांत ठराव झाल्याविषयीं पुण्याच्या लोककल्याणेच्छु पत्रांत लिहिलें आहे. तसें असेल तर तोही ठराव वऱ्हाडास लागू झाला पाहिजे. आमचे इकडे गेल्या महिन्यापासून स्टांपवेंडर लोकांस मात्र टिकिटाचा वरताळा मिळण्याचा ठराव होऊन तो अमलांत आला आहे. परंतु सर्वांस त्याचा फायदा अजून मिळूं लागला नाहीं.

———

ता० २८ मार्च व ता० ४ एप्रिल रोजीं संपणारे आठवड्यांत कापसाचे फुलप्रेसाचे गंठ्ठे रवाना झाले ते—

| | २८ मार्च | ४ एप्रिल. |
|---|---|---|
| वर्धा | ८१३ | ४३५ |
| हिंगणघाट | ४६६ | ३६९ |
| उमरावती | ५९३८ | ४१६५ |
| मूर्तिजापुर | १६३२ | १४१२ |
| शिगाव | ४३५९ | ९९४५ |
| खामगाव | ८४९० | ६५०७ |
| | २१६९८ | १६२३३ |

आतां हंगाम कमी होण्याचा सुमार आला ह्मणून माल कमी जाऊं लागला असे दिसते व त्या मानानें एका आठवड्यांत साडेपाच हजार गठ्ठ्यांचें अंतर पडलें. तरी एकंदरीत हे साल कपाशीचे व्यापारास चांगलें गेलें यांत संशय नाहीं. चालू महिन्याच ४ थे तारखेपर्यंत तीन वर्षांत गेलेले मालाचे टिपण येणेंप्रमाणें आहे.

| | गंठ्ठे |
|---|---|
| तिगस्त सालीं | १५८७५८ |
| गुदस्त सालीं | १८०८८४ |
| सालगजकुरीं | २३७३३० |

एकंदर हिशेबावरून समजतें कीं खामगावाहून कापूस इतर सर्व स्टेशनापेक्षां अधिक जातो. व वर लिहिलेल्या ६ स्टेशनाला फुलप्रेस आहेत त्याशिवाय मूर्तिजापुराला व जबलपुराकडे गादरवाडा येथें हाफप्रेस आहेत. त्यांतून दोन आठवड्यांत सुमार १५० गंठ्ठे दाबलेले रवाना झाले. बाकी जबलपूर लायनीवर कोठे प्रेस नाहींत असे दिसते. तिकडून बिन दाबणीचे डोके रवाना होत असतात ते दोन आठवड्यांत सुमार ४००० रवाना झाले.

मि० डनलप साहेब असिस्टंट कमिशनर यांचा अजमास या सालीं २७०००० गंठ्ठे रवाना होतील इतका होता तो पुरा होत आला इतकेच नव्हे तर सुमार तीन लाखाच्या जवळ जवळ नेरीज येईल असे त्यांनीं मुंबईचे चेंबर आफ कामर्स यांस लिहून कळविलें आहे.

---

मागाहून आलेल्या नोटिसा

नोटिस—बनाम मोहनलाल रोडमल ब्राह्मण वस्ती अकोले पैकीं मोहनलाल बाभुळगाव तालुके अकोट येथें रहात आहे यांस— देवकिसन बालमुकुंद साहू दुकान तळेगाव तालुके अकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे दुकानची बाकी तुह्माकडेस मुद्दल रूपये ४२५ शिवाय व्याज तुमचेकडेस येणे आहे. या ऐवजी चांदीचे व सोन्याचे डागिने गहाण आहेत. चार महिन्यांनीं रुपये देऊन गहाण सोडून घेऊं असा तुमचा करार असल्याप्रमाणें आम्ही अमल केला नाहीं. हल्लीं नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून आठ दिवसांचे आंत व्याजासुद्धां सर्व रुपये देऊन गहाण घेऊन जावे याप्रमाणें न केल्यास दिवाणींत फिर्याद करून खर्चासुद्धां सर्व रुपये तुह्मापासून भरून घेतले जातील. कळावे तारिख १० माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

(सही) देवकिसन बालमुकुंद साहू
दुकान तळेगाव.

---

नोटिस—बाळाप्रसाद गुरुप्रताप यांस खालीं सही करणाराकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मी आपले घराचें पाणी जाण्याचें पन्हाळ आमचे घरावर लाविले त्याबाबतींत तुह्मास अनुकूल असा जो तहशिलदाराचा हुकूम होता तो रद्द करण्याविषयीं आम्ही दावा करून अव्वल व अपील कोर्टांत फैसल मिळविला हें तुह्मास माहित आहेच. आतां तुम्ही ते पन्हाळ खुशीनें काढित नसल्यास ही नोटिस पावल्यापासून चार दिवसांत काढावे. नाहीं पेक्षां तुम्हावर आम्ही फिर्याद करूं. पन्हाळ काढून टाकण्याविषयीं दावा करून घेणें; त्यासंबंधी खर्चाबद्दल पुन्हा जबाबदार होणें हे तुह्मास बरें नाहीं यास्तव ही सूचना केली आहे. या नोटिशीचा खर्च नक्त द्यावा कळावे. तारिख ११ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

( सही ) सखाराम धोंडाजी डांगे
दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

आनरेबल गिब्स साहेब मुंबईस कौसलदार झाले त्यांचे जागेवर आनरेबल मि० जष्टीस पिन्ही साहेब यास अकाटिंग नेमिले. व आनर० मि० ज० केंबाल साहेब यांच्या जागीं आन० मि० जष्टीस नानाभाई यांस आक्टिंग नेमिले व आनरेबल मि० ज० मेलविल साहेब रजेवर जाणार आहेत ते गेले ह्मणजे त्यांचे जागेवर आन० नानाभाई यांस नेमून आन० केंबाल साहेबाचे जागेवर बारन हेंएच लारपेंट साहेब यांस नेमणार असा ठराव झाला आहे.

विलायतेत मेंसस्टर येथें थोर थोर लोकांच्या आंधळ्या मुलांनां विद्या शिकविण्याकरितां एक शाळा आहे. त्या शाळेतील एक अधळा विद्यार्थी दरहामच्या युनिव्हर्सिटींत म्याट्रिक्युलेशनचे परीक्षेत पास झाला व त्याला सालीना ५०० रुपयाची स्कालरशिप मिळाली असे कळतें. ही गोष्ट वाचून आमच्या इकडील अडाणी लोकांस परमाश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. कारण अंधळ्याला विद्याभ्यास करितां येईल अशी त्यांनां कल्पनाच नाहीं. ह्मणून इकडे कोणी गरीब अंधळा झाला कीं भिक्षा मागण्याला आला रस्त्यावर! विलायतेंत असे नाहीं. लांकडी तकत्यावर खोबण्या घेऊन त्या हातानें चाचपुन वाचतां याव्या अशाप्रकारची अंधळ्याकरितां तिकडे पुस्तके तयार झालेलीं आहेत.

अमदाबादच्या हितेच्छु पत्राला एकाचे फिर्यादीवरून माजिस्त्रेटानीं ५०० रुपये दंड केला होता तो अपिलांत रद्द झाला.

पुण्याचे लोककल्याणेच्छूवर रा० व्यंकट रंगो कटी यांनीं लायबलची फिर्याद केली होती ती फिर्यादिच्या व त्याच्या वकिलाच्या ३,४ दिवस सतत गैर हजिरीमुळे माजिस्त्रेटानीं काढून टाकिली.

हे सदरील दोन्ही प्रकार आह्मां वर्तमान पत्रकर्त्यांस संतोषाचे आहेत.

रा० रा० नारायण जगन्नाथ भिडे यांजवरील सेशन मुकदम्यांत त्यावर कांहीं शाबिदी न झाल्यामुळे गेल्या बुधवारीं सेशन जडजांनीं त्यांस दोषमुक्त केलें असे समजतें.

आनंदच्या स्टेशनापासून डाकुरपर्यंत बडोदा रेलवेची शाखा या आठवड्यांत सुरू होणार.

**पुणें कौशल्यशिक्षक मंडळी.**

गेल्या शनवारीं पुण्यांतील कौशल्यशिक्षक मंडळीची पांचवी साहामाही सभा सदाशिव पेठेंत फडतरे यांचे वाड्यांत सायंकाळीं पांच वाजतां भरली होती. ते समयीं प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रे अध्यक्षस्थानीं बसले असून चिटणीसानीं सभेचा रिपोर्ट वाचला. नंतर राव ब० माधवराव रानडे यांनीं फार सुरस संभाषण केलें. मग चाकू, वस्तरे, साबण, बंदुके; मेणबत्ती, नव्या यंत्रावर काढलेलें कापड, आगपेट्या वगैरे स्वदेशीय माल चांगला तयार केलेला सर्व लोकांस दाखविला. व ज्यास वस्तूची माहिती होती त्यानीं ती कळविली. शिवण्याचें यंत्र खरेदी घेण्यासाठीं एकशें(१००) रुपयाची सभेनें मंजूरी दिली नवीन म्यानेजिंग कमेटीची नेमणूकही केली. ने० ओ०

सर टी. माधवराव यांची स्वारी थोड्या दिवसांनीं रजेवर जाणार आहे. इंदुरांतील गटारयंत्रवाले सांगतात कीं, कारभारी साहेब परत येणार नाहींत; व याचें कारण त्यांनीं असे फैसावलें आहे कीं, श्रीमंतमहाराज साहेब कारभारी साहेबांस मुलकीकडील अधिकार देत नसल्यामुळें ते फार नाराजी झाले आहेत.

सिलोनमध्यें मोत्यें पिकतात तीं काढण्याकरितां गेल्या महिन्यांत आठ दिवस काम चाललें त्यांत ७,१२००० मोत्यांचे शिंपे निघाले व ते ६७,८०० रुपयांस विकले गेले.

रतलामचे रत्नप्रकाशकर्ते आपल्या भरंवशाचे वातमीदाराचे पत्रावरून लिहित

त कीं वासवदा इलाख्यांत फादावदेंत एक भिल्लीण आपल्या नवऱ्यास जंगलांत भाकर खाऊं घालीत असतां त्यानें पाणी मागितलें, तेव्हां ती भिल्लीण पाण्यासाठीं जवळच्या एका बावडींत उतरूं लागली; परंतु इतक्यांत पाणी कमी होऊं लागलें आखेर ती तळाशीं जाऊन पोंचली तेव्हां पाणी वाढूं लागलें व तिच्या कमरेपर्यंत चढलें हें पाहून तिनें ओरड केली ती ऐकून तिचा नवरा लागलाच धांवत येऊन त्यानें तिला वर काढिली; आणि पाहातां तों तिचें कमरेखालील अर्धांग साक्षात पुरुषाचें होऊन वरील अर्धांग पूर्ववत् स्त्रीचेंच राहिलें. पत्रकर्ते आणखी लिहितात कीं, त्या भिल्लिणीचीं पूर्वींचीं दोन मुलें कायम असून ती पुरुष झाल्यानंतर तिजपासून दुसऱ्या भिल्लिणीस झालेलीं हीं दोन मुलें कायम आहेत.

पुणें शहराचा टोलाचा मक्ता रा० रा० चितो पांडुरंग काळे यांणीं ७८२०० रुपयांस घेतला. व गेले बुधवारापासून त्यांणीं आपला अमलही सुरू केला. दरसाल म्युनिसिपालटीला मक्ता उतरत चालला याचें कारण आगगाडीकडील सर्व माल टोलाची जबर जकात असल्यामुळें दोन ओझानें येतो हें होय. याविषयीं म्युनिसिपालिटीनें विचार करावा. एकाला जखात पडावी आणि दुसऱ्यानें ती भुकींत फुकावी हें वाजवी नव्हे. लो. बं.

## चित्रकूटाचें वर्णन.

या पर्वताचें नांव चित्रकूट आणि गावाचें नांव सीतापुरी आहे- हें क्षेत्र जबलपुराहून रेल्वेमार्गीत जातांना १६६ व इलाहाबादेहून येतांना ६२ मैलावर माणिकपूर ष्टेशनापासून दहा कोस लांब आहे. माणिकपुरास उतरण्यास सराई असून तेथून जाण्यास पक्की सडक आहे व भाड्याच्या गाड्याहि मिळतात.

पूर्वी श्रीरामचंद्र अयोध्येहून जेव्हां वनवासाकरितां निघाले तेव्हां ते कांहीं दिवस या पर्वतावर सीतेसुद्धा येऊन राहिले होते त्या टेकडीस कामता नाथ असें ह्मणतात हा पर्वत गावापासून सुमारे एक कोसभर दूर आहे.

गावापाशीं पयस्विनी, मंदाकिनी, आणि गुप्त रूपानें गायत्री अशा तीन नद्यांचा संगम झाला असून या तीर्थास राघवप्रयाग असें ह्मणत आहेत. दशरथ राजाची उत्तरक्रिया रामचंद्रानीं एथच केली. नदीपलिकडे एक नवा गाव असून दुतर्फा नाशिकासारखे सुंदर घाट व देवालयें हि बांधलेलीं आहेत.

यात्रेकरी एथें सक्षौर स्नान करून तीर्थश्राद्ध करितात व कामतानाथ पर्वतास प्रदक्षिणा करितात. ही प्रदक्षिणा सुमारे तीन कोसाची असून रस्ता पक्का चुनेगचीनें बांधला आहे व या तीन कोसांत गिर्दैत ३६० श्रीरामाचीं व यांशिवाय आणखी दुसरे देवांचीं फारच लहान मंदिरें बांधलेलीं असून हरएक देवळामध्यें वैरागी लोक रहात आहेत व त्यांचे निर्वाहाकरितां सवा लक्ष रुपयांची जहागीरही चालत आहे या देवाचीं दर्शनें करित करित प्रदक्षिणा मोठि संतोषानें होत असते याच पर्वताचे शेजारीं एक दुसरी टेकडी आहे तीवर लक्ष्मणाचें मंदीर असून वर जाण्याकरितां पायऱ्या बांधलेल्या आहेत. असें ह्मणतात कीं रामानीं सीतेसह कामता नाथ पर्वतावर निद्रा करावी व लक्ष्मणानें येथून पहारा द्यावा.

या खेरीज सीतापुरीहून दोन कोसावर एक पर्वत असून तेथे कोटितीर्थ आहे त्याच पर्वतावर तेथून एक मैलावर देवांगनातीर्थ व तेथून एक मैलावर सीतेची पाकशाळा व तेथें जवळच हनुमान धारातीर्थ आहे. एथें हनुमानाची मूर्ति असून त्याचे डावे हातावर धार पडत आहे. कोटितीर्थापासून व हनुमानधारा या दोन जागां पर्वतावर जाण्यायेण्यास पायऱ्याहि बांधल्या आहेत.

या शिवाय अनुसूयेचें ठिकाण व फटकशिला ह्मणजे इंद्रानें काकरूप धरून सीतेचे स्तनाला स्पर्श केला होता ती जागा व आणखीहि त्या वेळस रामचंद्रानीं यज्ञादीक जीं जीं कृत्यें एथ केलीं तीं सर्व ठिकाण आहेत आणि या सर्व जागेवर बहुधा वैरागी लोक रहात असून जिकडे तिकडे जय श्रीरामचंद्र कीकी इत्यादि नामोच्चाराचा ध्वनि ऐकूं येत असतो. सारांश हें मोठें पुण्यक्षेत्र असून साधुसंताचें माहेरच आहे. येथून कालिंजरतीर्थहीजवळच आहे. सडकेचा रस्ता नसल्यानें मी तेथें गेलों नाहीं परंतु हें तीर्थ कोणतें ह्मणाल तर —

सप्तव्याधादशार्ण्यां मृगाःकालांजरेगिरि

इत्यादि श्राद्धाचे वेळेस ह्मणत असतात तेंच हें असें जाणावें.

या चित्रकूटाचे अलीकडे एक कोसावर कर्वी ह्मणोन गाव आहे तेथें श्रीमंत बाजीराव साहेब यांचे बंधू अमृतराव व त्यांचे पुत्र विनायकराव रहात असत व त्या योगानें येथें अजूनही पंचवीसतीस दक्षणी ब्राह्मणांचीं घरें आहेत.

काशी यात्रेस जाणारे येणारे लोकांस ही यात्रा सुगम असून सर्वांस माहिती व्हावी याकरितां हें वर्णन लिहिलें आहे.

## माहुरचें वर्णन.

माहुर हें क्षेत्राचें गाव असून निजामाईत हातगाव तालुक्यांत पुसदापासून पूर्वेस पंधरा कोस व दिग्रस येथून १०।११ कोस आणि उमरखेडाहून ईशान्येस पंधरा कोस आहे.

माहुर येथें जाण्यास वाटेनें जंगल अतिशय असून वाट वाकडी व जनावराची भीति फार आहे. हें गाव घाटावर आहे. व तेथें गाडी जाऊं शकत नाहीं. आणि कदाचित नेणेंच आहे तर मोठे प्रयत्नानें न्यावी लागते. बहुतकरून मुशाफर आणि यात्रेकरू लोक आपल्या गाड्या माहुरापासून दीड कोसावर ज्यांची सोय ज्या मार्गी असेल त्या मार्गी पैनगंगेच्या कांठीं सोडतात व ज्यांची सोय नसत नाहीं ते मोठ्या प्रयत्नानें बैलाच्या फेऱ्याच्या वाटेने वर नेतात.

पश्चिम, दक्षिण आणि उत्तर इकडून येणारे यात्रेकरूस प्रथम पैनगंगा नदी दोन तीन कोस उतरावी लागते. व पुसदाचे मार्गानें जाणाऱ्या यात्रेकरूस दोन कोस पैनगंगा नदी उतरली पाहिजे. या नदीचें पात्र येथें बरेंच विस्तीर्ण असून पाणी पुष्कळ आणि दोन्ही बाजूंनी झाडें दाट असल्यामुळें देखावा मोठा भयंकर दिसतो. बहुतकरून पुसदाकडून जाणारी यात्रा संगम येथ उतरते. संगम हें लहान खेडें आहे. व येथें पैनगंगेचा आणि पूस नदीचा संगम झालेला आहे. येथें गोसाव्याचा लहानसा मठ आहे यांत एक गोसावी अधिकारी रहातो. या मठास कांहीं गांवें जहागीर आहेत व शिवाय इनाम वगैरे आहे. येथें मुशाफर आपली गाडी सोडून जरूरीचें सामान घोड्यावर घेऊन माहुरास गेल्यावर उतरण्याची सोय मुशाफरांस पहाण्यास नको. कारण तेथें पोंचल्यावर तेथील ब्राह्मण मध्यमार्गांतच पुढें येऊन आपआपल्या घरीं त्यास ओढितात आणि ज्यांचा जो यजमान असेल त्यास ते आपल्या घरीं उतरण्यास नेतात. उतरण्याची जागा बहुतकरून गलिच्छ व रोगोत्पत्तीची आणि उतरणारास नाखुशी करणारी अशी असते.

माहुरास येतेवेळीं घाट चढून वर आल्यावर बरेंच मोठें मैदान आहे. त्या मैदानावर हें गांव वसलेलें आहे. गावाच्या सभोंवतीं लहान मोठीं दहापंधरा तळीं आहेत व त्यांचीं नावेंही निरनिराळीं आहेत. येथील ब्राह्मण या सर्व तळ्यांस तीर्थें असें समजतात. व त्या प्रत्येकास निरनिराळें नाव देऊन त्याचे महात्म्य व गुण कांहीं चमत्कारिक सांगतात. आणि याबद्दल पुराणांतहि आधार देतात. हल्लीं ते गुण त्या तळ्याच्या अंगीं कायम असतील असें आह्माला वाटत नाहीं. कारण ज्या तीर्थाचें वर्णन ते रोगशमनाविषयीं करितात त्याच तीर्थांत जर पांच सात दिवस स्नान केलें तर खचीत रोगाचें शमन न होतां उलटी वृद्धी मात्र होईल. याप्रमाणें तळ्याचे गुण आहेत. बाकी भाविक मात्र मोठ्या भावानें एकेक स्नान करितात.

या तळ्यांपैकीं मुख्य आणि महत्वाचें तीर्थ ह्मटलें ह्मणजे मोवाळें तळें आहे तेथील पाणी चांगलें आणि पाचक आहे. हें तळें तीन बाजूनीं बांधलेलें व एका बाजूनें खुलें आहे. या तीर्थावर उपाध्ये आपले यजमानास स्नानास घेऊन जातात. नंतर येथून यात्रेस आरंभ होतो. या तीर्थावर रामचंद्रानीं व परशुरामानीं मातृगया केली आहे. याकरितां यात्रेकरू लोकही त्याचे मनास येईल तर मातृगया करितात.

हीं सर्व तळीं आणि माहुर गाव माळच्या सपाटीवर आहे ह्मणून वर सांगितलेंच आहे. या सपाटीवर पुन्हा बऱ्याच उंचीचा एक डोंगर आहे. तो मोवाळें आणि इतर तळीं यांशीं लागून आहे. मोवाळें तीर्थाचें स्नान केल्यावर यात्रेकरू लोक गड चढण्यास आरंभ करितात व वर गेल्यावर रेणुका देवीचें देऊळ आहे तेथें दर्शनास जातात. तळ्यापासून देवीपर्यंत जाण्यास पायऱ्या बांधलेल्या आहेत. रेणुका देवीचें मंदिर बरेंच आहे व हें मूळ स्थान आहे. देवालय साधारण आहे. या देवीस ही कांहीं गाव जहागीर आहेत देवीचा फक्त मुखवटा आहे तो इतका मोठा आहे कीं एका मनुष्याचे वाणेंत यावयाचा नाहीं. येथें यात्रेकरू लोक येऊन त्यांनीं देवीची पूजा वगैरे केल्यावर देवीचे भोप देवीचे तोंडांत हात घालून चावलेला विडा (पुर्वीच कुटून तोंडांत भरून ठेविलेला असतो तो) प्रसाद ह्मणून भक्तास देतात.

येथे देवी पुढें नगारखाना आहे. तो त्रिकाळ वाजतो. व देवीजवळ नेमणूकही बरीच आहे. येथें काळी बाबा ब्रह्मचारी ह्मणोन तपस्वी ब्राह्मण आहे त्याने देवीचा सभामंडप बांधण्याचें काम चालविलें आहे. अजून पुरें झालें नाहीं लवकरच संपेल असें दिसतें. सभामंडपाचें काम चांगलें आहे.

पुढे देवीची प्रदक्षणा करतेवेळीं देवीचे दक्षणेस थोडा डोंगर उतरून परशुरामाचें देऊळ आहे. (परशुराम हा देवीचा पुत्र आहे)तेथें लोक दर्शनास जातात परशुरामाची मूर्ति पाषाणाची आहे. येथे एक लहानसें कुंड आहे परंतु त्यांत पाणी नसतें. तेथें जवळच थोडेसे वरते तुळजापुरचे देवीचें स्थान आहे. हीं सर्व दर्शनें करून यात्रेकरू पुन्हा देवीजवळ येतो. आणि नंतर ज्यास गावांत जाणें असेल. तो गड उतरून पुन्हा आपले बिऱ्हाडी जातो. येथून गाव एक कोसभर आहे. ज्यास जाणें नसेल तो इतर देवतांचीं दर्शनें घेण्यास फिरतो. त्याचा तपशील पुढें दिला आहे.

देवीचे पाठीमागें ह्मणजे पश्चिमेस उभे राहून पाहिलें असतां देखावा फार रमणीय दिसतो. ह्मणजे पैनगंगेचा प्रवाह सर्पासारखा नागमोडी वळणें वाहत आहे असा दिसतो. व अगदी खालीं पायथ्याशीं मोवाळें तीर्थ मोठें विस्तीर्ण दिसतें. व तळ्याच्या कांठचे मनुष्य अगदीं लहान पाखराप्रमाणें दिसतें. उत्तरेचे बाजूस माहुर गांव दिसतें. डोंगराचे पायथ्याशीं आणि आसपास झाडी अगदीं किर्र व दाट दिसते. लांबलांबचीं गांवेंही नवीन दिसतात. याप्रमाणें येथून देखावा फार चांगला दिसतो.

खालीं जी पैनगंगा नदी दिसते. तीस येथील लोक बाणगंगा असें ह्मणतात व येथें या नदीचें नाव बाणगंगा प्रसिद्ध आहे. हें नाव पडण्याचें कारण असें सांगतात कीं पूर्वीं ही नदी देवीचे दक्षिणेकडून देवीस डावें घेऊन जात होती तें परशुरामास न आवडून त्यांणीं बाण मारून तिचा ओघ फिरविला. जेथें तो बाण पडला व जेथून नदीचा ओघ फिरला त्या जागेस चक्रतीर्थ असें ह्मणतात व तेथून या नदीस बाणगंगा हें नाव आहे. हल्लीं ही नदी देवीचे पाठीमागून पश्चिमकडून वाहते. नंतर उत्तरेकडून पूर्वेस जाते. सारांश या नदीनें देवीस अर्ध प्रदक्षणा केली आहे.

देवीची यात्रा नवरात्रांत व चैत्र शुद्ध पौर्णिमेस भरते. नवरात्रांत देवीपाशीं होम वगैरे होत असतो आणि दसऱ्याचे दिवशीं पूर्णाहुतीचे वेळेस एक गरीब अजापुत्रास जिवंत होमकुंडांत टाकतात मात्र ब्राह्मण टाकीत नाहींत परंतु टाकणारास सांगतात. देवीचे स्नानास दररोज पाणी मोवाळें तीर्थाहून येते डोंगरावर देवीपाशीं पाणी नाहीं.

(पुढें चालू)

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा.प.

REGISTERD NO 7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० १९ माहे एप्रिल सन १८७४ इ० अंक १६

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | |
|---|---|
| | रु |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सहामाहीलेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

हें औषध गजकरणावर चालून खरून नायटे यांवरही चालतें किं० .... ०६

### जाहिरनामा.

इलिचपुर येथील डिपुटी कमिशनरची जुनी कचेरि जीस खुनी बंगला असे म्हण तात ती व त्यांतील घरें, जमीन, विहिरी झाडें, वगैरे सुद्धां तारिख १५ माहे मे सन १८७४ इसवी रोजीं उघड लिलावानें वि कली जाईल ज्या कोणाची इच्छा सदर्हू इमारत खरेदी करण्याची असेल त्यानें डिपुटी कमिशनर इलिचपुर यांचे आफिसांत त्या इमारतीचा नकाशा पहाण्यास मागित ला असतां त्यास मिळेल.

इलिचपुर तारिख ३१ मार्च सन १८७४ इसवी

J. I. Bushby.
डिपुटी कमिशनर इलिचपुर.

### NOTICE.

The Deputy Commissioner's old Kutcherry at Elichpur known as the "Khonie Bunglow" with its out houses, grounds, wells, trees &c will be sold by public auction on 15 th May 1874. Intending purchasers will be able to see the plan on aplication at the Office of the Deputy Commissioner at Elich.pur.

Elichpur 31 March 1874. } J. I. Bushby Deputy Commissioner Elichpur District.

### नोटिसा.

नोटिस—रामकृष्ण वल्लद भवानी मा स सोनार वस्ती पेठ खामगाव यांस अंबादा स वल्लद रामाजी सोनार वस्ती पेठ खामगा व तालुके अकोले यामकडून अशी नोटिस देण्यांत येते कीं तुमचा आमचा आर्यांआर्थी संबंध नसोन विनाकारण खो टी नोटिस दिली याचे कारण काय? तुम्ही आम्हास लिहिलें कीं आपचे सोयरीकीचे सं बंधांत तुम्ही पोच [illegible] दिवशीं सोयरिकीचे कामान [illegible] ऊन सो यरीक करून देऊ [illegible] त्यास तु मचे सोयरिकीचेही [illegible] माहित नाहीं तुम्ही लिहिले [illegible] तोळे ५ व नगदी रुपये ३० असे अमानत ठेविले तर आम्ही तुमची ठुसी व नगदी रुपये तीसही पाहिले नाहींत आणि विनाकारण तुफान घेऊन खोटी नोटिस दिली तर अ से तुफान घेऊन कोणाचें घर घेतले जात नाहीं करितां तुम्हास नोटिस देण्यांत येते कीं या नोटिशीचा खर्च व नुकसानी बद्द ल रुपये ५० व आगगाडीचे भाडें असे तुम्ही आठ दिवसाचे आंत द्यावे नाहीं तर कायद्याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल आणि तुम्ही कोणते चालीचे मनुष्य आहा त हे सर्व खामगावकरास माहितीच आहे व आम्ही कोणत्या चालीचे मनुष्य आहो हे ही सर्व लोक जाणतच आहे. कळावे तारीख १४ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

(सही) अंबादास रामजी सोनार
निशाणी खुद.

नोटिस—मल्हारी वल्लद दतुजी डोंगरे तेली वस्ती कोणार तालुके मेहकर यास खालीं सही करणार यामकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही मौजे लाखणवाडा येथें माझे बायकोस नेण्याकरितां आले ते समयीं तुम्ही मसी तेल दर पल्ला रुपये २५ प्रमाणें भावकरून दोन पल्याचे दाम रुपये ५० घेऊन गेले आणि बायकोसही गेले त्यास तुम्ही आमचेवर तेल आणिलें नाहीं करितां मी दोनवेळा समक्ष येऊन तगादा केला तर तुम्ही कबूल केलें कीं तेल व तुमची बायको बरोबर घेऊन येतो व तिचे अंगावरील डागिनें अममास ५०चे तेही तुम्ही खर्च केले. तर आतां तुम्ही सर्व डागिने व तेल दोन पल्ले असे जरूर घेऊन येणे आणि ही नोटिस तुम्हास पोचल्या दिवसापासून एक महिन्यांत तुम्ही येऊन तेलाचा डागिन्यासुध्दां निकाल केला तर उत्तम नाहीं तर मी दिवाणी कोर्टांत रीतीप्रमाणे फिर्यादी करीन खर्चासुध्दां रकम तुम्हास देणें लागेल असे न होतां लवकर घेऊन येणे कळावे. तारीख १९ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

(सही) राघोजी वल्लद सखाराम
तेली निशाणी खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि० वि० महाराज मी अयोध्येहून नि घालो तो चार मैलावर फैजाबाद ज्यास बंगालाही म्हणतात या शहरीं आलो. हे शहर मोठें असून चौकाची बांधणी, चहूंक डून कोट व कमानदार दरवाजे बांधून फार चांगली केली आहे. त्याचप्रमाणें गांवात मशिदी व सराया थोडीं देवालये ही आहेत. एथून रेलमार्गानें लखनौ शहर एथे आलो.

लखनौ हे शहर फार मोठे व प्राचीन पासून सर्वत्र प्रसिद्धही आहे. परंतु गेले बंडाचे वेळीं फार उद्ध्वस्त झालें. तथापि ज्या ज्या जागा अद्याप राहिल्या असून त्यापैकीं ज्या थोड्या मी पाहिल्या त्या केवळ अनुपम असून लक्षावधि खर्चानें झालेल्या अशा दिसल्या. प्रथमता मी केशरी बागेंत गेलो या बागेंत चहूंकडून केशरी रंगाच्या पाच मजली महिरापदार भिंति व चहूंकडे च्या दरवाजे मोठाले भव्य कमानदार अ सून त्यावर ते बंगले फार सुशोभित बांधले आहेत. याचे मध्यें तो बाग नानातऱ्हेचीं फलें व पुष्पांच्या झाडांनीं शोभायमान अ सून त्या बागेंत संगमरवरी दोन बारदाऱ्या शिवाय जागजागीं बैठका व हौद फारच रमणीय केले आहेत.

नंतर बादशाहाचे महाल पाहून एक प दार्थ संग्रहालय पाहिलें येथें अनेक जाती चे ग्रामपशु; व हत्ति, उंट, व्याघ्र इत्यादि वनपशु; मनुष्ये वानर इत्यादिकांचे सांगाडे तसेच मच्छ, कच्छ, मगर इत्यादि जलचर व मयूर इत्यादि अनेक जातीचे पक्षी व पतंग आणि भूमींत राहणारे सर्पादि; जंतु व नानाप्रकारचे दगड वनस्पत्ती व यंत्राचे नमुने व अंडीं हे सर्व निर्जीव असून कुजूं न देतां सजीवासारखे मोठ्या चमत्कारानें ठेवले आहेत.

शहरांतून गोमतिनदी वाहते ही नदी मोठी असून जागजागीं इला घाट बांधले आहेत आणि एक लोखंडी व एक दगडी असे दोन पुलही बांधलेले मजबूद पाहण्यां त आले.

नंतर मी हुसानाबाद म्हणोन एक कबर स्थानची जागा आहे ती पाहण्यास गेलो तेथील इमारतीचे वर्णन करण्यास तर मा झी प्राज्ञाच नाहीं. त्याच्या कमानदार उंच उंच रंगीत भिंती व त्याचे कमानदार भ व्य दरवाजे व आंतील संगमरवर इत्यादि दगडी कामे व त्यावरील घुमट व सोनेरी कळस आणि हौद व भोंवताली चित्र वि चित्र दगडी मैदान व आंतील हंड्या झुंब रे व दोनदोन पुरुष बिलवरी झाडें व गालि चे सतरंज्या इत्यादि सरंजाम पाहून मी तर थकच झालों. येथें चांदीचा मोठा ता ज्या दिसला ज्यावर सोनेरी जाळ्या व वेलबुट्टी आणि कांच महिराप मोठ्या का रागिरीनें फारच चमत्कारिक केलेल्या आहेत. हे सर्व पाहिल्यावर अशा इमारती बांधणें व त्या कामी असा अगणित पैसा खर्च करणें ही छाती केवळ मुसलमाना ची आहे दुसऱ्याची नाहीं असे स्पष्ट ध्या नांत येते. बाहेर एक तलाव असून त्याला चहूंकडून पायऱ्या केल्या त्यास हुसेनसा गरही म्हणतात.

हे शहर त्रेतायुगीं प्रथम लक्ष्मणानें वस विलें असेही हिंदुलोक म्हणतात येथें लक्ष्म णाचें एक देऊळही आहे.

येथून नैमिषारण्य जवळ आहे परंतु वीस कोस रेल सोडून जावें लागतें व चोरा चा उपद्रव फार म्हणोन गेलो नाहीं आणि कानपूरचे टिकिट घेतले लोभकराया हे विनंती. तारीख ३ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

एक यात्रस्थ.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. महाराज मी फिरत फिरत अकोलें येथें आलो तों असें समजलें कीं, येथें दोन लायब्रऱ्या आहेत. एक नगरची व दुसरी हायस्कुलांतील विद्यार्थ्यांनीं नवीन स्थापन केली. मला विद्यालयांतील लोकांचीं सत्कृत्ये पहाण्याची फार हौस यामुळें माझ्या मनानें साहजिकच ह्या नवी न तरुणविद्वानांनीं काढिलेल्या सत्कृत्याकडे ओढ घेतली. मी तेथे गेलों तों दोन महिन्यांतच तिची स्थिति उत्तम दि सून आली व अशीच वढती काळ राहिली तर खरोखरीच नावाजण्यासारखी होईल यांत संशय नाहीं. असेंही ऐकतो कीं, खेडेगांवचे बहुतेक मास्तर लोकही ह्या स त्कृत्यास आश्रय देऊं लागले आहेत ही वऱ्हाड सुधारण्याचीं चिन्हेंच होत. या लायब्ररींत पुस्तकांचाही संग्रह बराच आहे. पुढें ज्यास्त शोध केला तेव्हां असें समज लें कीं, ह्या मंडळीची स्वसुधारणेच्छु नावा ची एक सभा आहे तींत देशाभिमानावर भाषणे होत असतात हे पाहून फारच आल्हाद झाला व असें वाटलें कीं, धन्य या मंडळीची, व धन्य यांची एकी. असा च कित्ता सर्वांनीं घेतला तर देशसुधारणा म्हणजे हुं हुं करतां. असतु. एडिटरराव, ह्या ठिकाणीं मी त्या मंडळीची क्षमा मागून त्यांचे बाहेर दिसून येणारे, साधार ण वाईट मानलेले, असे एक दोनच दोष आहेत ते कळवितो ते असे कीं, त्यांनीं जरी त्यांचीं वयें अप्रौढ आहेत तरी कांहीं गोंगाड होईल अशाप्रकारें वागूं नये. गाणे (पुस्तकांतील श्लोक देखील) तेथे म्हणू नयेत ही मंडळी यंदाचे सुटींत कालि दासाचे अति सुंदर दृष्यं शाकुंतल नाटक करणार आहेत. ही गोष्ट हुषारीची, भूष णाची व विद्वत्तेची गोष्ट होय, तरी नाट कांतील पात्रांची अपसांतच पाहिजे तेव्हां पाहिजे तशी थट्टा करणें हे गैर म्हणून एवढें मंडळी कमी करील तर त्यास विशेष भूष णावह होईल. ह्या मंडळीस माझी अशी ही प्रार्थना आहे कीं त्यांच्या मंडळीचे अ हितेच्छु एक दोन कावळे आहेत ते ह्या आमिषास पाहून केव्हां स्पर्श करून त्यांस अपवित्र करितील ते कळणार नाहीं तर यांनीं याविषयीं सावध रहावें. माझे शेव टी ह्या मंडळीस हेंच मागणें आहे कीं मी जे लिहिलें त्याचा त्यांनीं राग मानूं न ये मी केवळ त्यांचा कनवाळु मित्र आहे. त्यांच्या प्रियकर मित्राचा, व त्यांनीं ज्यांस आपल्यांत मुख्य मानिलें आहे त्याचा मी निवळ मित्र आहे व मी त्यांनीं काढलेलें सत्कृत्य निर्दो ष अव्याहत चालावे एतदर्थ जग्या बंधु प्रीतीनें हे पत्र लिहिलें आहे यांतील दो षांची किंवा चुकयाची ते मला क्षमा कर तील अशी त्यांस प्रार्थना आहे कळावें लो भ करावा हे विनंती.

अकोला ता. १४ एप्रिल सन १८७४ सनी.

एक वाचनगृह हितेच्छु
फिरस्ता.

'खामगावास नाटक पहाणारा' लिहितो कीं, मानवर तेथे नरेच खेळ झाले परंतु कालच्या शनवारच्या मागील शनिवारीं कांहीं दुसरी मंडळी येऊन मिळाल्या कारणानें थोडासा रंग आला होता. एकंदरींत फार्स बराच करतात सर्व पत्र छापण्यात दाखील नाहीं.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुध्ध ३ शके १७९६

(ज्ञानप्रकाशावरून)

युरोपियनानें युरोपियनाचा कांहीं गुन्हा केला असतां त्याचा बरोबर इन्साफ हायकोर्टांत होतो. पण युरोपियनानें नेटिवांचा गुन्हा केला असतां त्याचा हायकोर्टांत बरोबर न्याय होत नाहीं अशी लोकांची समजूत फार वर्षांपासून आहे. अशी गोष्ट घडण्याची कारणें अनेक आहेत. युरोपियन लोकांस आपले जातीचा अभिमान जसा आहे तसा ब्राम्हणास देखील आपले जातीचा नाहीं. कितीएक इंग्रज लोकांचें ह्मणणें आहे कीं, ज्या युरोपियन लोकांस गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली असेल त्यांस नेटिव लोकांसमोर काम करावयास लावूं नये. व ज्या तुरुंगांत नेटिव कैदी असतील त्या तुरुंगांत देखील ठेवूं नये. नेटिव लोकाचे दृष्टीस युरोपियन कैदी पडले असतां नेटिवांस युरोपियन लोकांचे ठिकाणीं जी पूज्य बुद्धी आहे ती जाते. इतका अभिमान ज्या लोकांस आहे ते आपले जातीचे लोकांवर गुन्हा शाबीत होऊं लागला असतां काय करतील तें सांगावयास नको. युरोपियन लोकांचे हातून गुन्हा बहुतकरून मुंबईपासून दूर ठिकाणीं होतो व त्याची चौकशी मुंबईस हायकोर्टांत जुरीपुढें झाली पाहिजे. ज्या ठिकाणी गुन्हा होतो तेथील लोक अडाणी असतात यामुळे त्यांस बारिस्टराचे प्रश्नाचे बरोबर जबाब देता येत नाहींत यामुळें त्याचे बोलण्यावर कोर्टाचा भरंवसा पडत नाहीं. दुसरे युरोपियन सर्वच एकसारखे दिसतात यामुळें त्यांस ओळखण्याची पंचाईत पडते. एकंदरींत युरोपियनावर गुन्हा शाबीत होण्यास फारच कठिण पडते. कधीं कधीं साक्षी पुरावा बरोबर असला तरी जुरीची खात्री होत नाहीं यामुळें ते कैदीस सोडून देतात. जज्जास गुन्हा शाबित आहे असें वाटले तरी जुरीपुढें त्याचे कांहीं चालत नाहीं.

याप्रमाणें कितीएक युरोपियन गुन्हेगार सुटले असतील. एके इंग्लिशमनचें असे ह्मणणें आहे कीं, गुन्हेगार सुटावा अशी इच्छा असली तर त्यास हायकोर्टाकडे चौकशी करतां पाठवावें ह्मणजे सरकारचा साक्षीदार वगैरे लोक नेण्या करतां पुष्कळ खर्च होऊन शेवट युरोपियन कैदी सुटून जातो. अशीं उदाहरणें आमचे वाचकांचे लक्षांत पुष्कळ असतील पण जें नुकतेंच मुंबईचे हायकोर्टापुढें झालें त्याची हकीगत वाचकांस कळवितों.

देवळाली येथे गेले फेब्रुवारीचे २० वे तारखेस ९८ वे रेजिमेंटचे दोन सोजीर जार्ज माकफंड आणि एब्राहामडेलो या दोघांनीं दंगा करून लालचंद देवीचंद यास जेय नदीनें जखम केली असें चार्ज होतें. ही रेजिमेंट विलायतेस जाण्याकरतां मुंबईस येत असतां वाटेंत देवळाली येथें थोडे दिवस राहिली होती. तेव्हां एक सोजीर एके वाण्याचे दुकानीं वाटे विकत घेण्यास गेला होता. तेथें त्याचे किमतीबद्दल दोघांची बोलाचाली होऊन सोजिरानें वाण्याचे तोंडावर एक ठोसा मारला. वाणी यानें चीफ कान्स्टेबलाकडे फिर्याद केल्यावरून त्यानें सोजिरास पकडून चौकीवर नेलें. सोजिरास पकडून ठेविला ही गोष्ट रेजिमेंटचे दुसरे सोजिरास न सहन होऊन एक पार्टी बाहेर पडली. आणि सोजिरास सोडून घेऊन गेले आणि गावचे लोक जे जमा झाले होते त्यांचा व सोजीर लोकांचा तंटा होऊन कापडवाल्यास एके सोजिरानें दोन जखमा केल्या. चीफ कान्स्टेबल व दुसरे लोक यांनीं या सोजिरास ओळखलें व पहिले नंबरचे सोजिरानें जखम केली ह्मणून सांगितलें. ज्या वेळेस या लोकांस ओळखलें तेव्हां हे पहाण्यावर होते व तंटा होऊन फार वेळ झाला नव्हता. ज्या वाण्यास जखमा केल्या होत्या त्यानेंही या सोजिरास ओळखलें. तरी त्या पाहण्यावर जो सार्जंट होता त्यानें साक्ष दिली कीं, हे सोजीर मला समजल्या शिवाय बाहेर जाऊं सकले नसते. या कैदी लोकांनीं एक अमेरिकन साक्षीदार आणिला होता. त्याचे दुकान वाण्याचे दुकानाजवळच होतें. यानें साक्ष दिली कीं, ज्या मनुष्यानें वाण्यास जखम केली त्यास मी ओळखतो. तो मनुष्य इंग्लंडास गेला. या दोघांपैकीं एकानेंही वाण्यास मारलें नाहीं व दंग्यांतही नव्हते. जज्जानें हा खटला जुरीस समजून सांगतांना असें सांगितलें कीं, नेटिव पोलिसाच्या साक्षीवर भरंवसा फार भिऊन ठेवावा. व याचप्रमाणें सर माथ्यूसास यांचे ह्मणणें असे. तसेच पोलिस आफिसराजवळ कैदीनें कांहीं कबूल केलें असल्यास त्यावरही फारसा भरंवसा ठेऊं नये. आतां सार्जंटचे साक्षीवरून असें दिसतें कीं कैदी त्यास समजल्याशिवाय बाहेर जाऊं सकतेना. व जज्जास वाटलें कीं, हे लोक उगीच तंट्यांत जाऊन पडणार नाहींत व हे बहुतकरून तिकडे गेले नसावेत असें जज्जच्या तोंडांतून निघाल्यावर जूरीनें लागलीच सांगितलें कीं, गुन्हा नाशाबित आहे व कैदीस सोडून दिलें. आह्मास वाटतें कीं, हल्लीं जी मुसलमान लोकांची चौकशी चालली आहे ती या जज्जा समोर चालती तर फारच बरें झालें असतें. ज्या मुसलमान लोकांस शिक्षा झाल्या त्यांस बहुतकरून पोलिसांनींच ओळखून काढलें आहे व या जज्ज साहेबांचे मतीं पोलिसाची ओळख उपयोगी नाहीं यामुळे सोजिरासाले ते लोकही सुटून जाते. जज्जानीं खटला सोडून दिला. वाण्यास जखमा झाल्या त्या मात्र त्याचे पदरीं पडल्या व मुंबईपर्यंत हेलपाटे घ्यावे लागेल ते कापडाचे नफ्याबद्दल आले असें समजावें. सरकारातून या गोष्टीचा बंदोबस्त व्हावा. नाहींपेक्षा सर्व लोकांची हल्लीं अशी समजूत होऊन गेली आहे कीं, गोऱ्यानें नेटिवांस ठार मारलें तरी त्यास शिक्षा होत नाहीं व त्याप्रमाणें लोकांचे अनुभवास ही येतें. मि० नौवरोजी फर्दुनजी यांनीं नुकतेंच विलायतत एके सोसायटीपुढें जें भाषण केलें त्यांत युरोपियन लोक नेटिवाशीं कसे वागतात याचीं बरींच उदाहरणें दाखविलीं आहेत. कितीएक साहेब लोकांचे ह्मणणें आहे कीं, अशा वागणुकीनें एकादे वेळीं आपल्या राज्यास धोका बसणार आहे. आपलें हिंदुस्थानचें राज्य आपले नीतीचे जोरावर चाललें आहे. आपली नीति शाबूत न राखिली तर कोणते वेळेस धक्का बसेल तें समजत नाहीं. याकरतां जो साहेब हिंदुस्थानांत येतो त्यानें असें समजावें कीं माझे हातून वाईट कृत्य झालें असतां त्यानें मला एकट्यास काळिमा येतें असें नाहीं तर त्याच्या योगानें मी इंग्लंडचे लोकांस काळिमा आणतों.

## वऱ्हाड.

मेजर वेब साहेब आफिशियटिंग जुडिशियल कमिशनर तारिख १६ रोजीं प्रात:काळीं सेशनाकरितां उमरावतीस गेले. तेथील सेशन वगैरे झाल्यावर ते परभारे चिखलदऱ्यास जाणार व ते बहुधा मे महिनाभर तिकडेसच रहातील असें वाटतें.

—०००—

येथील हायस्कुलें उदाहक ह्मणजे ता० २० एप्रिलपासून उन्हाळ्याचेसुटीमुळें तारिख १० जूनपर्यंत बंद रहातील.

—०००—

हवापान— गेल्या रविवारापासून पांच सहा दिवस ह्या आठवड्यांत बहुतकरून आकाश अभ्रांनीं व्याप्त होतें. त्यांतून मंगळवारीं रात्रौ तर विजांचे चमकणें व थोडे पावसाचे शितोडेही आले. काल पर्वापासून आकाश अगदी निरभ्र झालें आहे व उष्णाही अतिशय होतो.

—०००—

आह्मास लिहिण्यास अतिशय आनंद वाटतो कीं वऱ्हाडांतील जमिदार लोकांचे इनाम लाकशांत सामील करून फक्त ह्या जमा मात्र त्यांस मिळत होता. तो इनामाबद्दल सर्व हक्क जगायतपासून ह्मणजे सदहूं इनाम बंद केल्यादिवसापासून सर्व हक्क ज्याचे त्यास चुकवून देण्याविषयीं रेसिडेंट साहेबाकडून रिविन्यु कमिशनर साहेबांकडे या आठवड्यांत लिहून आलें आहे. हें ऐकून कोणासही संतोष झाल्या वाचून रहाणार नाहीं व यावरून जुने हक्क कायम राखण्याविषयीं आमचे दयाळू इंग्रज सरकारचे हें ढळढळीत उदाहरणच समजलें पाहिजे.

—०००—

उमरावती वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा भाषण समारंभ ता० १९ रोजीं सुरूं झाला या विषयीं सविस्तर माहिती पुढील अंकांत आह्मी आपले वाचकास कळवूं.

—०००—

रा. रा. वामनराव बाळाजी ओझरकर अकोलें जिल्ह्याचे आफिशियटिंग डिपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर यांस डायरेक्टर साहेबांनीं कांहीं कामाकरितां बोलाविल्यावरून ते मागील बुधवारीं चिखलदऱ्यास जाण्या करितां उमरावतीस गेले.

—०००—

रा. रा. एकनाथ मोरेश्वर कान्हेरे माजी तहशिलदार यांस अकोल्यास डिपुटी कमिशनर आफिसांत डिपुटी क्लार्क आफ धि कोर्टची ७० रुपये पगाराची जागा दिल्याविषयीं आह्मी मागे लिहिलें होते त्याप्रमाणें ते तारिख १५ रोजीं येऊन सदहू कामावर रुजू झाले. व वासुदेव सदाशिव पिसोळकर हे पहिल्या ६० रुपयाचे जागेवर आले.

---

मलकापूर येथील माळ्याची मुलगी नामे पटु उमर वर्ष ८।९ इच्याशीं भाग्या माळी या नावाचे मनुष्यानें जबरीचा संभोग केला ह्मणून तो पोलिसांत पकडला गेला असून चौकशी सुरू आहे असें तिकडील बातमीदाराकडून समजतें.

—०००—

(जळगाव मित्राकडून.)

हैद्राबादेहून वऱ्हाड पहावयास आलेले नवाब खुरशिदजा बहादर जी. सी. एस. आय. विकर उल उमराव बहादर यांचे चिरंजीव मागे नरनाळा पहावयास गेले होते ते गेल्या आठवड्यांत नांदुऱ्याकडून जळगाव तालुका पाहून जामोद वगैरे कडे गेले होते व तिकडून परत येतांना जळगावशाळेतील मुलांची परीक्षा घेऊन खाऊकरितां १७ रुपये बक्षिस दिले असें बातमीचे पत्रावरून समजतें.

नळगाव येथें हणमंत खंडेराव तहशिलदार याचे जावई फोटोग्राफचा कारखाना घेऊन आले आहेत.

तारिख ११ व १२ ह्या दोन रात्रसि गोठे बादल झाले. तेणेकरून आंबे झडले, केळीचे नुकसान झालें, पानवेली पडल्या झाडें मोडलीं व घरें उडालीं ता. १७रोजीं टाकळी आणि सावरगाव या गांवांस आग लागली तेणेंकरून नुकसान बरेंच झालें. तारिख १२ चे रात्रीस टुणकी जहागीर हें गांव जळालें अजमास घरें १५० जळालीं यांत जनावरें सुमार ३६ जाया झालीं. मनुष्यांस मात्र बिलकूल दखल झाली नाहीं.

---

शिगावास तारिख ७ माहे मजकुर रोजीं खून झाला त्याची माहिती तेथील आमचे मित्रास मिळाली ती येणेप्रमाणें—

सुमारे अका वर्षांचा तेली जातीचा मुलगा आपल्या घराचे आसपासचे रस्त्यांत इतरमुलांसहवर्तमान नेहमीप्रमाणें खेळत होता त्याचे अंगावर कांहीं रुप्याचे व दोन चार सोन्याचे हे बारीकसारीक दागीने मिळून सुमार ३६ रुपये किमतीचे होते. इतक्यांत कोणीएक लोभी मनुष्य (त्या मुलाचा प्रत्यक्ष मामाच असें ह्मणतात) याचे मनांत त्या दागिन्यांचा अभिलाष करण्याची इच्छा उत्पन्न होऊन त्यानें ते दिवशीं ह्मणजे मंगळवारीं दोन प्रहरीं त्या मुलास उडविण्याकरितां एक पतंग व खाण्यास मिठाई घेऊन गावाबाहेर सुमार कोस दीड कोसावर जंगलांत नेऊन तेथें त्या मुलाचें डोकें ठेचून अनाथाचा त्या घातकानें प्राण घेतला आणि त्याचे अंगावरील दागिने काढून ते तेथेंच कोठें रानांत पुरून ठेविले व कांहीं बारीकसारीक दोन सोन्याचे दागिने होते ते बाजारांत सोनारास विकूनही टाकिले. पुढें दुसरे दिवशीं प्रात:काळीं कोणीं वाटसरानें तें मुलाचें प्रेत पाहून खून झाल्याची पोलिस स्टेशनांत खबर दिली तेव्हां येथील चीफ कान्स्टेबल ही स्टेशनांत असल्याकारणानें लागलीच त्यांनीं स्वत: तपास करण्यास प्रारंभ केला.

सदर्हू कामांत शिफार्नीं योग्य रीतीनें व फार दक्षतेनें चौकशी केली. तो तपास सुरू झाल्यापासून सुमार चोवीस तासाचे आंतच गुन्हेगाराचा व मुद्देमालाचाही शोध लागला. पकडलेला गुन्हेगार जरी मी स्वतः खून केला नाहीं असे ह्मणतो तरी बहुतकरून त्यानवर अपराधाची शाबिदी होईल असें वाटतें. खटल्याची चौकशी माजिस्त्रेटपुढें सुरू आहे. निकाल झाल्यावर त्याप्रमाणें पुढें लिहूं. येथील चीफ कान्स्टेबल यानवर कांहीं आरोप असल्याचे टाइम्समध्ये प्रसिद्ध झाले आहे पण आह्मास त्याप्रमाणें खात्रीलायक हकीकत समजली नाहीं. कदाचित कोणी द्वेषभावानेंही लिहिले असेल असेंही संभवते.

—ooo—

मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस—सूर्यभान वल्लद रामा भाकरे रहाणार गोरेगाव परगणें बाळापुर तालुके अकोलें यांस खालीं सही करणार देतात कीं, तुह्मी आह्मा त्रिवर्गांवर तारीख १७ माहे मार्च सन १८७४ इसवीची नोटिस दिली कीं, 'तुह्माजवळ मी खामगावाहून कर्ज काढून झाडीचीं खापरें वगैरे आण ण्याकरितां पुंजी ठेवण्यास दिली त्या रकमेचा तुह्मी माल आणून विकला त्याचा नफा वगैरेही हिशेब तुह्मास मी मागितला असतां तुह्मी दाखविला नाहीं सर्व माल व कागद तुमचे जवळच आहेत. आठ दिवसांत हिशेब दाखवावा आणि मुद्दल व नफा काय राहिला असेल तो आह्मास द्यावा, सदरहू मुदतींत न दिल्यास आह्मी दिवाणींत दावा करूं' असें लिहिलें आहे पण हा सर्व खोटेपणा आहे. तुह्मी आह्मास कधींच सदरहु बाबतींत रुपये दिले नाहींत. तसेंच देणें घेणें हेंही झाले नाहीं. व उगीच खोटी नोटिस दिली आहे तेव्हां यांत भलेपणा व यश हे मिळणें नाहीं. हा सर्व आदावतीचा प्रकार आहे. या बाबतींत आह्मापासून एक पैसाही मिळावयाचा नाहीं. इतक्यावर तुह्मास जसें वाटेल तसें करण्यांत आमचेकडून हरकत नाहीं त्याचा जबाब आह्मी देऊं. कळावें तारिख १६ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

(सह्या) १ रामा वल्लद दर्यांजी पाटिल
१ सखाराम वल्लद दत्ताजी पाटिल दस्तुर माधवराव पाळे
१ माधव केशव गुमास्ते कुळकर्णी दस्तुर खुद्द.

नोटिस—शे॰ हुसेन वल्लद पिरज व इमाम वल्लद बाबन व रहिमु वल्लद उकर्डा नकरकसाई वस्ती उमर प्रगणें अडगाव तालुके अकोट यांस खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं तुह्मी आह्मास तावेगहाण रुपये २००चे ता॰ १४ मार्च सन १८७४ इसवी रोजीं लिहून दिले असोन रजिस्टरही तुह्मी करून आणले आहे तें अजून आह्मास आणून दिलें नाहीं व त्यांत लिहिलेप्रमाणें मालही अजून आमचे ताब्यांत दिला नाहीं व रुपये २०० घेऊन बसला आहात तर ही नोटिस पोचल्या तारखेपासून चार दिवसांत रजिस्टर दस्तऐवज व त्यांत लिहिलेप्रमाणें मालही आणून आमचे ताब्यांत द्यावे न दिले तर ही मेची सुटी निघताच तुमचेवर लागलीच फिर्याद केली जाईल. ही नोटिस दिली सही तारीख १६ माहे एप्रिल सन १८७४ इसवी.

तालाकलम नोटिसीचा व मुकदम्याच्या खर्चासुद्धा सर्व रुपये तुह्मापासून भरून घेतले जातील. हे कळावे. तारीख मजकूर.

(सही) निरंमनसिंग वल्लद गुलाबसिंग वस्ती उमर तालुके अकोट दस्तुर खुद्द.

## विक्रीचीं पुस्तकें

खालीं लिहिलेलीं पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीस तयार आहेत. हीं पुस्तकें रोख किंमत देणारास मात्र मिळतील बाहेर गावचे नेणारास डांकहशील शिवाय पडेल.

| | रु॰ आ॰ पै॰ |
|---|---|
| पोथ्या वगैरे. | |
| अध्यात्मरामायण | ४ —० —० |
| प्रायश्चित्तदुशाखर | ०—१२—० |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा | ०— २— ० |
| अनुस्मृती | ०— ३— ० |
| भौमस्तवराज | ०— २— ० |
| गायनप्रकाश | ०— ४— ० |
| विवेकसिंधू | ०— ८— ० |
| चतुश्लोकीभागवत | ०— ४— ० |
| पंचायतनमावळी | ०— ३— ० |
| शिवसहस्रनामावळी | ०— ३— ० |
| विष्णुसहस्रनामावळी | ०— ३— ० |
| चक्रव्यूह | ०— १— ० |
| भुपाळ्या | ०— १— ० |
| व्यंकटेशस्तोत्र | ०—२— ० |
| धावे | ०— १ —० |
| हरिपाट | ०—१ — ० |
| अमृतरायाचे कटाव शुकरंभा चरित्र | ०—४ — ० |
| नळाख्यान | ०—३ — ० |
| आर्या मोरोपंती द्रोणपर्व | २— ०— ० |
| ,, ,,मंत्र रामायण | १— ८— ० |
| वामन पंडितकृत श्लोक संग्रह भाग पहिला | ०— १२ ० |
| सदर्हू भाग दुसरा | ०— १२ ० |
| खणपतीचे श्लोक | ०—० ६ |
| भगवद्गीता | ०—६ ० |
| रमोदर्शन शांति | ०—६ ० |
| वाचन संबंधी. | |
| लोकहितवादीकृत निबंधसंग्रह | ४—०—० |
| रुक्मिणी हरण नाटक | १—८—० |
| हरिश्चंद्र नाटक | १—८—० |
| वालिवध नाटक | ०—६—० |
| इंग्रजाचीबखर | ६—०—० |
| वसंतमाला | १—४—० |
| ध्रुवाख्यान | ०—१—० |
| गोपिचंद राजाचें नाटक हिंदुस्थानी | ०—१२—० |
| बालज्ञान | ०—२—० |
| इंग्लिश पहिले बुकाचें भाषांतर | ०—२—० |
| सिंहासनबत्तीसी हिंदुस्थानी | ०—८—० |
| अंकलिपी | ०—०—६ |
| सोंवळे हिशेब | ०—२—० |
| कायद्यासंबंधी | |
| माहारीचे रूळ | ०—६—० |
| मुंबई मुलकी सर्क्युलरें | ४—०—० |
| स्मालकाज कोर्टाचा कायदा सन १८६९ चा आक्ट ११ | ०—४—० |
| सन १८६९ चा आक्ट १धारा बसविण्याचा | ०—४—० |

## वर्तमानसार.

### नवीन कायदा.

गेल्या बुधवारी कायदे कौन्सिलचे काम चालून मुंबईतील ट्रामवे संबंधी कायद्याच्या मसुद्याचे दुसरे व तिसरें वाचन होऊन कायदा पसार झाला.

बंगाल्यातील नेटिव सिव्हिलियन बाबु सुरेंद्रनाथ बानरजी ज्यांवर नुक्ताच एक खटला झाला होता त्यांणीं तीन महिन्याची रजा घेतली आहे व आपली हकीकत हिंदुस्थानाच्या स्टेट सेक्रेटरीस सांगण्याकरितां ते विलायतेस-निघून गेले,

राणी साहेब विक्टोरिया यांचा जर्मनीस जाण्याचा बेत कलोन स्याक्षिटास कोबर्ग येथील आधारपूर्वक बातमी आली आहे. व तिजविषयीं ते खातरीनें सांगते कीं, ये महिन्यांत विक्टोरिया राणी साहेब साक्सकोबर्ग येथें जाऊन तेथे कांहीं दिवस राहावे असा त्यांचा बेत आहे. व त्याबरोबर ड्यूक व डचेस आफ इडिंबरो हो जाणार. याच वेळीं जर्मनीचा बादशहा व राजपुत्र व राजकन्या ज्यांची नुकतीच त्यांनीं बर्लीन येथे भेट घेतली ते राणी साहेबांस तेथे भेटावयास येणार आहेत.

### बंगाल.

एका बंगाली पत्रात असे लिहिलें कीं, कलकत्ता जिल्ह्यांतील एका चांगल्या प्रतिष्ठित मुसलमानानें आपला धर्म सोडून तो वैष्णव धर्माप्रमाणें वागूं लागला असून त्यानें आपले नाव शिवदास असे ठेवले आहे. याच्या बायकोनें पूर्वीचा धर्म न सोडल्यामुळे तिच्या हातचे तो अन्नपाणी घेत नाहीं- सदरहु मुसलमान हिंदू बनला आहे तथापि हिंदु लोक त्याच्या बराबर अजून आहार विहार करीत नाहींत.

गेले बुधवारीं पेठ सदाशिव खुण्या मुरलीधराचेजवळ राहणारा आंधळा रा॰ रा॰ घोंपंत वैशंपायन उमर वर्षे ३९ यानें आपले हातानें विळीनें रात्री गळा कापून घेतला. कारण समजत नाहीं, परंतु त्रासानें ही गोष्ट झाली असावी.

**देवमामलेदार.**— भगवद्भक्त रा॰ यशवंतराव माहादेव ज्यांस देव मामलेदार ह्मणतात त्यांची स्वारी सुमारें आठदिवसांपासून मुंबईत आली असून गिरगांवांत आंग्रे यांच्या वाडींत रा॰ रा॰ निळकंठराव दफतरदार यांच्या घरीं उतरली आहे. एथे आल्यापासून यशवंतराव महादेव यांची आंग्र्यांच्या वाडींत यात्रा भरावयास लागली आहे. असें ह्मणण्यास चिंता नाहीं सर्व दिवस व रात्रीचे तीन वाजे पर्यंत, दर्शनास आलेल्यामनुष्यांची गर्दी मोडत नाहीं. स्वारी बाहेर गेली असते त्या वेळी शेकडो लोक, वाहीन, व रस्त्यावरून दर्शन घेण्याच्या इच्छेने बसले असतात. नारळ, केळीं फुले, पेढे, वगैरेचीं आंग्र्यांसमोर दहावीस दुकानें झालीं आहेत. भगवद्भक्त यशवंतराव महादेव यांस होळकर सरकाराने बलाविले असून त्यांस नेण्याकरितां होळकराचे सरदार रा॰ रा॰ सखाराम गावडे ऊर्फ बापूसाहेब हे एथे आले आहेत. नानारबातमी अशी आहे कीं, यांस होळकर सरकारानें बलावणें आहे ह्मणून, आह्मीं जावें किंवा कसें हें गवर्नर साहेबास विचारण्याकरितां स्वारी एथें आली आहे. असे विचारण्याचे कारण असें कीं, यशवंतराव हे पूर्वी मामलेदार होते व त्यांस सरकार पेनशन देत असतां ते घेत नाहींत. तेव्हां मामलेदारीची जागा पुनः देत असल्यास इंदुरास जाणार नाहीं ह्मणून गवर्नर साहेबास विचारण्याकरितां एथें आले आहेत.

**गोऱ्याचें व्यर्थ फिरण्याचा परिणाम.**—

मि॰ हाल, रेवा काठांतील रेव्हेन्यू सर्वे सुपरिंटेंडेंट यांचें चमत्कारिक प्रकारानें मायें फिरून त्यांनीं तीन मनुष्यें गोळी घालून मारलीं. यांस असें वाटलें कीं, मला डाकू रघ्या रंछोडजी समोर नेऊन बळी देणार. असें हाल यांस वाटून आपला बचाव करण्याकरितां त्यांनीं आपल्याजवळ हत्यार ठेवले. ठाकूरजी समोर आपल्यास नेऊन बळी देणार असें यांच्या डोक्यांत वेड कसें भरले असेल ते असो. परंतु एथील दररोज निघणाऱ्या वर्तमानपत्रांत छापलेली हकीकत आह्मी लिहित आहो. हे महालांत आपल्या मदमेसह फिरत असतां, ता॰ १ माहे मजकुर रोजीं सदरहू प्रकारच्या वेडानें यांचे डोकें इतके तापलें कीं, आपल्यास कोणी मारील या भयानें नेहमीप्रमाणें गाडींत बसून न जातां एका मुकामाहून दुसऱ्या मुकामास पायीं गेले. परंतु पायीं चालून थकले तेव्हां यांचे त्यांचें मास्त फिरून प्रथम दोन मनुष्यांवर गोळी घातली, तीं तत्काळ जागच्या जागीं मरण पावलीं. नंतर एका घोड्यावर गोळी घातली. व नंतर तिसऱ्या मनुष्यावर गोळी घातली तो कांहीं वेळाने मरण पावला. याप्रमाणें मि॰ हाल यांच्या हातून अनर्थ झाला ह्मणून हाल साहेबाच्या भाववंदांस फार दुःख झाले आहे. मि॰ हाल यांस युक्तीनें पकडून मुंबईस आणून दिवाणी इसपितालांत ठेवले आहे. आतां या गोष्टीचा पुढं निकाल होईल त्याप्रमाणे कळवूं. परंतु आश्चर्य असे वाटते कीं, जा तीन मनुष्यांचा यांच्या हातून प्राण गेला तो एकीकडेसच, राहून हालसाहेबाच क्षणीक माये फिरून त्यांच्या हातून सदरहु गोष्टी झाली ह्मणून साहेबलोक हालसाहेबाकरितां फार हळहळत आहेत दुसरें आश्चर्य असे कीं, हाल साहेबाचे याप्रमाणें वारंवार माथे फिरते असें माहित असतां सरकारानें यांस आजपर्यंत नोकरींत कसे राहूं दिले ते समजत नाहीं. हाल साहेबाच्या हातून ज्याप्रमाणे गुन्हा झाला आहे त्याप्रमाणे नेटिवाच्या हातून झाला असतां तर, अगोदर त्याची चौकशी केल्यावांचून त्यास दिवाणी इस्पितालांत पाठविले असते काय? एकाद्या नेटिवाचें हाल साहेबाप्रमाणे वारंवार माथे फिरते असे माहित असतां त्यांस नोकरी ठेवले असते काय?

राव बहादूर शंकर पांडुरंग पंडित यांनीं रेल्वे कंपनीवर नुकसानीबद्दल पांचशें रुपयांची फिर्याद पुण्याचे मदत मुनसफाकडे केली होती. तिचा निकाल काल रोजीं सांगितला. रेल्वे कंपनीनें पांचशें रुपये व झालेला खर्च रा० ब० शंकर पांडुरंग यास द्यावा असा निवाडा केला. याबर बहुत करून अपील होणार नाहीं असें वाटते.

वायव्य प्रांताचे लेफटिनेट गवरनर सर हल्यु मूर विलायतेस जाताहेत. त्यांचे जागेवर सर जान स्ट्राची यांची नेमणूक झाली.

हुबळीहून कोल्हापूरा पर्यंत आगगाडी करण्याचा विचार चालू आहे.

आनरेबल गिब साहेब ४थे तारखेस कौंसलदार झाले त्यावेळीं १९ तोफांची त्यांनां सलामी झाली.

हैदराबादेकडे दिवाण सर सालरजंग साहेब यांनीं ठराव केला आहे कीं पब्लिक वर्क्स खात्यांत परीक्षा पास झाल्या शिवाय कोणास जागा मिळणार नाहीं.

रत्नागिरी येथे रक्तपित्तीचे आजाऱ्याकरितां स्वतंत्र इस्पितळ करण्याचा विचार होऊन वर्गणीची यादी फिरत आहे तिजवर मि० दिनशा माणकजी पेटिट यांनीं १२००० रुपयांचा आंकडा घातला आहे. हे औदार्य मोठें वर्णनीय होय. बाकीचे आंकडे जुनवी असून एकंदर ११४६२ रुपये जमले आहेत असें कळते.

बडोद्याचे गायकवाड सरकार नवसरीस जाणार होते ते जाऊन दाखल झाले. उन्हाळाभर तेथें राहण्याचा त्यांचा विचार आहे.

कलकत्ता हायकोर्टाचे चीफ जष्टीस सर रिचर्ड कौच्य हे चाकरीचा राजिनामा देऊन पेनशन घेणार आहेत.

लंकेकडे समुद्रांत बुड्या मारून मोत्याचे शिंपले काढण्याचे काम चालले होतें तें पुरें झालें. सुमारें अडीच लक्षाचा माल निघाला व त्यांत सरकारास एक लाख रुपये मिळाले असे समजतें.

विलायतेंतील इनकमट्याक्सच्या सरव्यावरून खालीं लिहिलेली माहिती समजली आहे. ज्या लोकांस सालीना पांचलक्ष किंवा त्याहून अधिक रुपये कर द्यावा लागतो त्या लोकांच्या प्राप्तीची याद.

| | गृहस्थ | ऐकंदर प्राप्ती. |
|---|---|---|
| इंग्लंड | ५४ | ४८९४६९४० |
| स्काटलंड | ९ | ६६६२०४० |
| ऐर्लंड | ४ | २९९४१०० |
| | ६७ | ५,८६,०३,२१० |

यावरून समजतें कीं विलायतेत ६७ अति संपत्तीमान लोक आहेत ते वर्षास सुमारे सहा कोटि रुपये मिळवितात.

## माहुरचें वर्णन.

(मागील अंकावरून पुढे चालू)

देवीची यात्रा पूर्ण झाल्यावर यात्रेकरू देवीचा गड शंभर हात खालीं उतरून नंतर डोंगराच्याच किनाऱ्यानीं दत्ताचे दर्शनास जातात. दत्ताचे शिखर देवीचे आग्नेय दिशेस, सुमारे एक कोसभर आहे. त्याची उंची व देवीचे शिखराची उंची बरोबर आहे- यात्रेकरू त्या शिखराजवळ गेल्यावर तेथें पायथ्याशीं एक कुंड आहे त्यांत बारमाहिनें पाणी असते. या कुंडास सर्वतीर्थ असें म्हणतात. या कुंडाचे पाणी फारच स्वच्छ आणि पाचक आहे. येथें गोसाव्याचा पहारा असतो. ते यात्रेकरू अगर कोणासही स्नान करूं देत नाहींत. अगर धुऊं देत नाहींत. फार काय काळया बुडाचे भांडे किंवा मळका तांब्या बुडवू देत नाहींत. ज्यास स्नान करणे असेल त्याणें वर पाणी आणून स्नान करावें. येथे वानर फार आहेत व तीं इतकीं धीट आहेत कीं, मनुष्याचे फराळाचें उचलून नेतात. हातावरील फुटाणे कांहीं न भीतां उचलून घेतात. याच कुंडाचे पाणी पखालीनें शिखरावर पिण्यास नेतात. व देवाचे स्नानास नेतात. येथें थोडीशी विश्रांति घेतल्यावर यात्रेकरू शिखरावर जातो. तेथें दत्तात्रयाचे मंदीर सर्वोत्कृष्ठ आहे व रमणीय बांधलेलें आहे. येथें गोसाव्याचा एक महंत राहतो. आणि सुमारें दोनशे गोसावी वर रहातात येथें मुख्य देव, दत्तात्रय आहे. त्याची महादेवाची साळुंका आहे. या देवास पंचवीस हजाराची जहागीर असून किरकोळ उत्पन्नही पंचवीस हजार आहे. येथें यात्रे करूची संभावना फार चांगली राहते. येथे जे महंत आहेत ते स्वभावानें फार चांगले व नेमधर्मी आहेत. ते ब्रह्मचर्य वृत्ताने असतात आणि मीठ कधीही खात नाहींत. येथें जितके गोसावी राहतात तितके सर्व ब्रह्मचारी आहेत. खटले घेऊन वर रहाण्यास देवाची आज्ञा नाहीं व जो खटलेकरी त्यास शिखरावरून हाकून देतात- म्हणजे त्यानें खालीं गावांत जाऊन रहावें. येथें बायका मुळींच ठेवीत नाहींत. यात्रेकरू बरोबर ज्या दर्शनास येतील, त्या कांहीं या गणतींत धरण्याच्या नाहींत. महंताची एक घोड्याची पागा आहे. व दोन हत्ती आहेत याच महंतांनीं मोबाळे तीर्थावरील कर हैदराबादेस जाऊन निजाम सरकाराकडून माफ करविला. याबद्दल यात्रेकरू लोक महंताचे फार आभार मानितात. जितके येथें गोसावी आहेत तितक्यांचे जेवण वगैरे संस्थानांत असते. रात्रीस मात्र वाटेल त्यांणीं आपआपले घरीं करून खावें. सर्वांची घरें वर देवळाचे सभोवती जवळपास आहेत.

देवाची मूळ मूर्ति वर सांगितल्या प्रमाणें महादेवाची साळुंका आहे. व भोग मूर्ति सुवर्णाच्या एक फूट उंचीच्या आहेत त्यांची पूज्या वगैरे होतेच परंतु कुलपांत बंद असतात. त्यांचे दर्शन महंताचे परवानगी शिवाय अगर पुजाऱ्याचे परवानगी शिवाय होत नाहीं या मूर्तीचे दर्शनास मात्र चार आपयापासून वर नजराणा द्यावा लागतो म्हणजे देवापुढें ठेवावा लागतो तेव्हां दर्शन होतें. बाकी मूळ मूर्ति म्हणजे महादेवाची साळुंका आहे तेथें यात्रेकऱ्यांच्या इच्छेवर आहे.

देवाजवळ नेमणूक वगैरे बरीच आहे. हमेशा येथें पुराणीक पुराण सांगत असतो. व यास त्याबद्दल वर्षासन मिळते. तसेच माहुराहून दररोज ब्राह्मण पंचांग सांगण्यास येत असतो. त्यासही कांहीं मिळते. तसेच संस्थानांत कारकुन मुत्सदी खजिना, भांडारघर वगैरे नेमणुका बऱ्याच आहेत व बंदोबस्त चांगला आहे.

येणे प्रमाणें या संस्थानाची माहिती आहे. येथूनही देवळाचा देवीचे शिखरा प्रमाणेंच दिसतो. म्हणजे वायव्य दिशेस लांब अंतरावर रेणुका देवीचे शिखर, पश्चिमेस पाणगंगा नदीचा प्रवाह, पूर्वेस डोंगर आणि झाडी याप्रमाणे आहेत. दत्ताचे शिखरावर बागवानाचीं झाडे बरींच आहेत व पारीजातकाचे वन सर्व डोंगरभर पसरलें आहे. जे वेळेस हे वन फुलतें. ते वेळेस डोंगर फार चमत्कारिक दिसतो. येथें त्या फुलाच्या लाखो लाखोल्या जरी वाहिल्या तरी तीं संपावयाचीं नाहींत.

येथून यात्रेकरू दक्षिणेच्या बाजूने शंभरेक हात खालीं उतरून सुमारें एक मैलभर अनुसयेचे शिखरास जातात. तेथें एक लहानसे देऊळ मात्र आहे. त्यात अनुसयेची मूर्ति आहे, हें संस्थान दत्ताचे संस्थाना खालीच आहे. तेथेंही पांच सात गोसावी रहातात बाकी वर्णन करण्यासारखें नाहीं. तेथून जवळच दक्षिणेच्या बाजूला अत्री ऋषीचे देवालय आहे. तेथें ऋषीची महादेवाची पिंडी आहे. हीं सर्व दर्शनें घेऊन यात्रेकरू मागे फिरून डोंगराचे किनाऱ्याने रेणुका देवीचे देवळाजवळ उतरून येतो तेथून पुन्हा देवीचे शिखर न चढतां उजव्या हातानें व दक्षीण दरवाजानें किल्ल्यात जातो.

किल्ल्यांत गेल्यावर प्रथमच इनाळे म्हणून एक तळें लागतें. हें तळें लहानसे असून भयंकर आहे. सर्व किल्ल्यांत एवढेच पाणी आहे. तळ्याचे पश्चिम बाजूनें शंभर सवाशें फूट वर चढल्यावर एके टेकडीवर एक बुरूज आहे. त्या बुरूजात महाकाली देवीची स्थापना आहे. हा बुरूज आणि रेणुका देवीचें शिखर हे बरोबर उंचीचे असून दक्षिणोत्तर आहे. या दोहीचे मध्यें एक खिंड आहे या योगानें रेणुकादेवीचे शिखर आणि महाकालीदेवीचे बुरूज हे दोन्ही विभागले गेले आहेत. येथून रेणुका देवीचे शिखर नीट दक्षिणेस आहे. महाकालीदेवीस नेमणूक वगैरे कांहीं नाहीं फक्त पुजाऱ्यास देवीपुढें जे काय येईल तेंच उत्पन्न आहे.

महाकाली देवी माहुरचे अधिकाऱ्यांनीं बुरूजांत चिनून टाकली आहे. व दरवाजावर मोठमोठाल्या शिळा बसवून दरवाजा बंद केला आहे. बाहेर एक शेंदुराची प्रतिमा मांडलेली आहे तिची पूजा होते, मूळ मूर्तीची पूजा बुजली असल्यामुळें होत नाहीं. देवीस चिनून टाकण्याचे कारण लोक असें सांगतात कीं, एके दिवशीं देवीस नैवेद्यास उशीर झाल्यामुळें पुजाऱ्याचे पोर देवळांत खेळत होतें तेंच उचलून देवीने तोंडांत टाकिलें आणि आपला नैवेद्य पुरा केला. हें पुजाऱ्यानें बाहेरून येऊन देवीचें स्वरूप पाहिल्यावर अतिशय भिऊन गृहांत पळून गेला आणि अधिकाऱ्यांस सांगितलें त्यावरून त्यांणींही समक्ष येऊन जेव्हां देवीचें भयंकर स्वरूप पाहिलें तेव्हां त्यांसही वाटलें कीं, हे चिन्ह ठीक नाहीं व पुढेंही असेच अपघात होतील म्हणून देवीस लागलीच त्या बुरूजांत चिनून टाकलें. याप्रमाणें देवीची हकीकत [या हकीकतीवरून असें वाटतें कीं, देवीपेक्षां अधिकाऱ्याचा अम्मल ज्यास्त होता ] आहे,

येथून पुढें यात्रेकरू किल्ला पहात जातो. हा किल्ला एकी राजानें बांधला आहे असे लोक सांगतात. किल्ला हल्लीं पडला आहे. व येथें पहाण्यासारखें कांहीं एक नाहीं फक्त या किल्ल्यांत राजाचा महाल आणि दारूची कोठी अशा एक दोन इमारती आहेत. परंतु त्याही अगदीं बेमरामत आणि मोडकळीस आलेल्या आहेत. किल्ल्याहून उत्तर दरवाज्यानें म्हणजे दिल्लीं दरवाजानें बाहेर पडल्यावर माहुरास जाण्याचा उतार लागतो. दिल्ली दरवाजा मात्र अजून बराच कायम आहे. व त्याचे एका बुरूजावर पारशी अक्षराचा एक लेख आहे; परंतु त्या लेखांतील बहुतेक अक्षरें फुटून गेलीं आहेत त्यामुळें बरोबर समजत नाहीं व वाचताही येत नाहीं.

या रस्त्यानें खालीं उतरून माहुरास जातांनां डोंगराचे पायथ्याशीं मानभाव लोकांचे संस्थान आहे त्यास देवदेवेश्वरी असें म्हणतात. येथें मुख्य देवता दत्तात्रय आहे. परंतु महादेवाचे साळुंकेचे बदला तेथे एके मंदिरांत चुनेगच्ची ओटा दक्षिणोत्तर बांधलेला आहे व त्यावर किनखापी मसरूच्या गाद्या व उशा हे मांडून तो ओटा सुशोभित केलेला असतो. आणि ह्याची पूजा वगैरे करितात. बाजूस खोलींत महादेवही आहे परंतु महादेवाचा बाण हेमाडपंती देवळाच्या दगडी खांबाप्रमाणे एक दगडी खांब आहे. येथें मानभावाचे महंत असतात व मानभावाचे लोकही रहातात. येथें देऊळ व सभामंडप हीं कामें चांगलीं रमणीय बांधलेलीं आहेत. समूर एक मोठें तळें आहे हे पाहिल्यानंतर गाव लागतें.

माहुर हे गाव पूर्वी मोठें शहर होतें. परंतु हल्लीं ठिकाठिकाणीं उजाड झालें आहे व हल्लीं एका लहानशा गावाप्रमाणें हे गांव आहे. येथील लोक या माहुरचे सर्व जागेस कोरी भूमिका असें म्हणतात. याचें कारण ते असे सांगतात कीं, येथें देव आणि दैत्य यांची लढायी होऊन रक्तस्राव झाला नाहीं व ही कोरी भूमिका असल्यामुळें येथील लोकांस यश नाहीं असे ते म्हणतात. येणेप्रमाणे माहुरचें वर्णन आहे.

मुसलमान लोकही येथे शेखफरीद यांच्या उरसास व दर्शनास येत असतात. शेखफरीद यांस दरगा वगैरे कांहीं नाहीं फक्त माहुरापासून तीनकोस जंगलांत दत्ताचे शिखराचे पूर्वेस एका दरींत लहानसी कोठडी कोरलेली आहे. ते शेखफरीद यांची अनाख्नाची जागा आहे. तेथें हिंदु लोक अतिशय लांब व जंगलात असल्यामुळें अगत्यकरून जात नाहींत. फक्त पहाणार काय ते जातात.

माहुरास जंगल फार असल्याकारणानें एवतमाळ जिल्ह्याचे व वाशिम जिल्ह्याचे साहेब लोक फिरावयास आले म्हणजे येथें शिकारीस येत असतात.

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा.प.

REGISTERD NO 7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० २६ माहे एप्रिल सन १८७४ इ० अंक १७

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराचे किमतीविषयीं.

वर्तमानपत्राच्या पुष्कळ दिवसांच्या अनुभवावरून, देशांत अलिकडे जी पत्रांची प्रवृत्ति होत चालली आहे तिजवरून, व आमच्या वऱ्हाडच्या लोकांस वर्तमानपत्र वाचण्याची काहीं गोडी लागण्यास कारण व्हावें ह्मणून १८७३च्या जानुआरी पासून त्यापासून वऱ्हाडसमाचाराच्या किमतींत आह्मी थोडा फेरफार केलेला आहे तो असा—

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |
| तीन गृहस्थ एका गावीं पत्रें मागवितील तर एकेकास वर्षास अगाऊ वेगी हाशील | १ |
| पाच किंवा अधिक पत्रें एका गावीं घेणारे असून तीं एकाचे नांवें मागवितील तर प्रत्येकीं आगाऊ डाक हाशील वर्षांचे | ०८ |
| सदर्हू वर्ष भरल्यावर देतील तर | १ |

खेडे गावचे पाटील पटवारी लोक व गरीब शेतकरी लोक तसेच लोअर क्लास स्कुलाचे मास्तर लोक यांस सदरील फेरफारापासून पत्र घेण्यास उत्तेजन यावें असे आमचे अनुमान आहे व त्याप्रमाणें बऱ्याच अंशीं घडून येईल तर याहूनही किंमतीचे दर कमी करावे अशी आमची इच्छा आहे व ती सफल होणें आश्रयदात्यांच्या उदारपणावर अवलंबून आहे.

साल अखेर किंमत भरणारास तो पाठविण्याची तादृश काळजी असत नाहीं व पांच पांच वर्षांच्या किंमती अजून किसेकांकडे यावयाच्या आहेत असें पाहून किंमतीचे अखेर दरांत आह्मी काहीं फेरफार केला नाहीं.

आगाऊ किंमत देणे ती पत्र सुरू झाल्यापासून एक महिन्यांत द्यावी अशी आह्मी मुदत ठरवितो.

### नोटिसा व जाहिराती छापण्याचे दर.

| | रु. |
|---|---|
| दहा ओळींचे आंत | १ |
| दहा ओळींहून अधिक असल्यास दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश भाषेंत नोटिस वगैरे छापविल्यास दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

नोटिस लिहिलेली न आणितां छापखान्यांतून लिहविल्यास २५ ओळीपर्यंत दोन आणे व त्याहून अधिक मजकूर असल्यास च्यार आणे लिहिणावळ पडेल. व इकडून रजिष्टर करणें असेल तर वर्तमानपत्राचे अंकाबद्दल च्यार आणे रजिष्टर बद्दल च्यार आणे, व डाक हाशिलाबद्दल अर्धा आणा मिळून साडेआठ आणे ओळींचे दराशिवाय द्यावे लागतील.

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं औषध थंड पाण्यांत भिजवून अंधाचे उटीप्रमाण पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ६ सहा आणे.

हें औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

### जाहिरात.

शिवलीलामृत अध्याय ११ व व्यंकटेशस्तोत्र

असे एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थांनीं आमचें छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या थोड्या प्रती विकावयाच्या आहेत. किंमत ६ आणे डाक हाशील ०१

### काल्पित नाटक.

प्रवेश २ रा.

(तारिख ५ एप्रिलच्या अंकावरून.)

पात्रें { विश्वासराव............घरधनी<br>रामचंद्रपंत--विश्वासरावाचे मित्र

विश्वासराव कचेरींतून घरीं आल्यानंतर कोचावर मांडीवर पानसुपारीचें तबक ठेवून सुपारी कातरीत आहेत तों त्यांचे मित्र रामचंद्र पंत येतात त्यांस पाहून—

विश्वासराव— गुड् आफ्टर नून सर. तुह्मी आलयानें मी मोठा आनंदी आहे. यावं

रामचंद्रपंत—( कोचावर बसून ) काय, रावसाहेब आपण इंग्लिश कसले शब्द उच्चारिलेत? मला काहीं समजत नाहीं. या भाषेंत मला चांगले ह्मणा अथवा वाईट ह्मणा, मी बापडा भोळा आहे.

विश्वासराव—( शेंडीवरून हात फिरवून ) काय रामभाऊ तुह्मास इंग्रजी येत नाहीं? अगदींच का येत नाहीं?

रा०— कोठून येणार? दोन पुस्तकें शिकून पुढें उज्जनीस होतों. काय सांगावें रावसाहेब, स्वराज्याची गोष्ट वेगळी आहे, आतां हल्लीं वसंतऋतु आहेना? या दिवसांत राजवाड्याच्या मोठमोठ्या खिडक्यास व जेथें महाराजाची स्वारी बसते त्या ठिकाणीं धमाशाच्या ताज्या हिरव्यागार लावून त्यावर शेवकजन बेमार पाणी टाकीत आहेत, भिस्ती सरकारवाड्या समोर थंडगार पाणी शिंपडीत असल्या मुळें गार वारा येऊन तो तोषदाई होत आहे. सरकारवाड्यासभोंवार स्वारी आतां फिरावयास निघणार ह्मणून शिबंदी लोक, मानकरी, शिपाई, खिसमतगार, इत्यादि लोक आप आपल्या योग्यतेनुरूप कोणी गजारूढ, कोणी म्यान्यांत, कोणी उंटावर अशा प्रकारच्या थाटांनं सरकारवाड्यासमोर महाराजाची स्वारी केव्हां येईल ह्मणून वाट पहात आहेत, भालदार वारंवार ललकारताहेत हत्ती, घोडे, मोठमोठे शब्द करीत आहेत अशा प्रकारचा थाट पहाण्यास आतां फार दिवस कसचे सापडतें? रावसाहेब, आपल्यासारखे कामगार तेथें हवे होते मग काय छटा आहे ती बघावयास सापडती.

वि०— काय सांगता राव, पोकळ गोष्टीच. आमच्या ह्या इंग्रज बहादरच्या राज्यांत काय थोडी मजा आहे? तुह्मी तिकडून आला नवीन, ह्मणून तुह्मास असे वाटतें पण वास्तवीक पहातां आमच्या बहादरच्या राज्यांत गम्मत नाहीं असें ह्मणू नका.

रा०— "जेथें पोळी तेथें गोडा घोळी" आपण या राज्यांतले कामगार, तशांत मोठ्या पगाराचे, ह्मणून काय तीं या राज्याच्या ऐश्वर्याची वाखाणनी कराल तर करा परंतु मी तें कबूल करणार नाहीं, या राजाची व त्यांतील कामगारांचें पैशा प्रमाणें ऐश्वर्य तर काहींच दृष्टीस पडत नाहीं मात्र कामगारांनीं आपल्या शेंड्या आंखूड केलेल्या, पायांत पाटलोन, बूट, अंगांत कोट, हातांत सोट, प्यावयास ब्रांडीचा घोट, खावयास डबलरोट, वस्त्रालंकाराऐवजीं व्यर्थ नोट, अशा प्रकारच्या ऐश्वर्याचे विलासी राजछबेले ह्या राज्यांत पुष्कळ आपडतील. आतां आपल्या सारख्यांस ही गोष्ट लागू नाहीं. परंतु वर सांगितलेल्या प्रकारचे विलास भोगणारे पुष्कळ असून दीड हळकुंडात पिवळे होणारे असे लोक पुष्कळ सापडतात.

वि०—एस् व्हेरी वेल, तुह्मी सांगितलें तें मी समजलों.

रा० रावसाहेब, घरीं हो एस नि फेस कशाला हवें. आपण पाहिजे तर सरकारी कामांत इंग्रजीचा उपयोग करा, कोट घाला, रोट खा, पाहिजे ते करा पण काहो साहेबानें का तुह्मी कोट पाटलोन घाला, ब्रांडी प्या, शेंड्या आंखूड आमच्या फार ख्या करा, ह्मणून नेटिव कामगारांस सक्युलर केलेन् आहे? काय आहे तरी काय? तो कोण काल (वर डोळे करून) हं हं हणमंतरावाच्या मावशीच्या मामाच्या पुतण्याचा बाबभाऊ काल आपल्या धाकट्या तीन दिवसाच्या कारटास मांडीवर घेऊन ह्मणे कीं, पोरी, कुत्र्याला किनी डॉग् ह्मणतात नवें? नि मांजराला क्याट् ह्मणतात ! ! ! पोरीला कशास इंग्रजी हवें?

वि०— खरें तुम्ही ह्मणतां तें खरें. पण काहो किती वाजले? (कोटाच्या खिशांतलि वॉच् काढून पाहून ह्मणतो) ओहो पांच वाजून तीन मिनिटें झालीं. चला आपली फिरावयाची वेळ झाली. (पागोटे घालितो)

रा०— तुमची सहल करण्याची वेळ झाली नि आमची संध्येची वेळ झाली. एकूण एकच.

(दोघे निघून जातात)

(पुढें चालू.)

### पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूंनये.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० खालील मजकुरास आपल्या सुंदर पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे.

पिंजर हा गाव अकोल्याचे आग्नेयीस बारा कोसांवर आहे. या गावाचें नाव पिंजर असें पडण्याचें कारण असें दिसतें कीं पूर्वीं येथें पिंजर 'कुंकू' फार उत्तम होत असे, त्यावरून पडलें असावें. पूर्वीं हा गाव बराच सुशोभित होता, परंतु मध्यंतरीं अस्मानी उपद्रवानें अगदीं विशोभित झाला आहे. व लोक विशेष सधन नसल्यामुळें सर्वत्र झोपडीं झालीं आहेत. या गावास पाण्याची फार कमताई आहे. येथें नदी आहे व ती बरीच मोठी आहे परंतु पावसाळ्या खेरीज गावाजवळ पाणी रहात नाहीं. या नदीस धरण बांधलें असतां पाणी पुष्कळ राहून लोकांसही फार सुख होईल. येथील विठ्ठल मंदिराची दुरुस्ती रा. रा. अण्णा साहेब तहशिलदार व रा. रा. मंनुसिंग चि० का० बारशी टाकळी यांच्या खटपटीनें उत्तम प्रकारची झाली आहे, तर अशा परोपकारी व लोककल्याणाहितेच्छू गृहस्थांस अशी सूचना करावीसें वाटतें कीं वरील कृत्याकडे त्यांनीं लक्ष पुरविलें असतां त्यांचे नांव चिरकाल राहील.

या गांवचे पोलीसपाटील मंनुसिंग ह्मणून आहेत. हे गृहस्थ सरकारी कामांत दक्ष असून ते काम उत्तम प्रकारें चालवित आहेत यांच्या दक्षतेनें गावचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा आहे. शाळेच्या कामांतही यांची वारंवार मदत आहे. गांवांतील लोकांस शाळेंत मुलें पाठविण्याविषयीं हे नेहमी उपदेश करीत असतात. तर संधि आल्यास सरकारांनीं लक्ष पुरवून यांची बढती केली असतां ते लायक आहेत. पत्र विस्तार फार झाला याची माफी असावी कळावें ही विनंती.

लोकमित्र

क्ष.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. मी बाळापुर या गावीं फिरत फिरत गेलों असतां त्या ठिकाणीं देशपांडे यांचे मोठमोठे वाडे पाहून व ते बांधण्याची शैली व ढोल वगैरे पाहून मला मोठा विस्मय झाला. ते गांव फार विस्तीर्ण असल्याकारणानें व त्या गांवच्या सभोंवतीं दोन नद्यांचा वेढा असल्याकारणावरून माझें मन त्या स्थळीं अगदीं गढून जाऊन

अशांटी लोकांबरोबर लढाई करण्याप्रीत्यर्थ इंग्रजसरकारास एकंदर ९० लक्ष रुपये खर्च लागला.

या सालीं मक्केच्या यात्रेस सुमारे एक लक्ष साठ हजार लोक गेले होते.

बंगाल्यांतील दुष्काळप्रीत्यर्थ विलायतेस तारिख १४ माहे मजकूर पर्यंत ७९०००० रुपये जमा झाले आहेत. ने० ओ०

पंचवटी—एका अग्निहोत्र्याच्या घरीं होमसमयीं कांहीं लुच्चे लोक वाईट हेतूने आले असतां कुंडातला अग्नि प्रदीप्त होऊन होमशाळा पेटलीसें दिसले ते पाहून ते लोक परतले. घरीं आल्यावर पाहतात तो त्यांच्या नाईकाची बायको मेली. होमशाळेस अगदी इजा झाली नाहीं. यांत सत्यांश किती आहे हे कळत नाहीं. इं० प्र०

पुणे शहरांत सौभाग्यवती सरस्वतीबाई भ्रतार सदाशिवराव बल्लाळ गोंढे व सौ० सरस्वतीबाई भ्रतार गणेश वासुदेव जोशी या बायांच्या विनंती बायकांत चिठ्यांच्या द्वाराने होऊन हे हळदीकुंकू गुदस्त साला प्रमाणें झाले. बायका हिंदू जातीच्या मात्र आल्या होत्या. जागा काळेबावरातील श्री विष्णुमंदिरांत बाहेर मंडप देऊन चांगली केली होती. सरासरी ३००० मुलीबाळी व बायका मिळून गेल्या होत्या. ज्ञा. प्र.

विलायतचा जमाखर्च —सर स्टाफर्ड नार्थ कोट यांणीं ता० १६ एप्रिल रोजीं हौस आफ कामन्स यांस कळविलें कीं सन १८७३ सालांत राज्याची एकंदर जमा ५७,३७,५०,००० रुपये झाली व खर्च रुपये ७६,५०,००,००० झाला व सन १८७४ सालीं जमा रु० ७८,००,००,००० होतील व खर्च रु. ७,२९,००,००० होईल व रु० ५५,००,००० बाकी राहील असा अजमास केला आहे असेंही कळविलें असें समजतें.

मुसलमानांचा दंगा—कराची येथील मुसलमानांतील मुख्य लोकांस कर्नल स्यांर्ट तेथील जिल्हा माजिस्त्रेट यांणें बलावून जर तुमचे लोक शहरांत कांहीं दंगा करतील तर त्यांची योग्य रीतीनें खोड मोडण्याकरितां मी स्वतः मनावर घेईन असी त्यांस सक्त ताकीद दिली.

भावनगरचे ठाकूर एकदम चार बायका करणार व हा लग्नसमारंभ लवकरच होणार आहे. ह्या चार मुलींपैकीं एक वढवानच्या राजाची मुलगी, दुसरी गोंडळच्या राजाची बहीण, तिसरी ध्रांगद्राच्या राजाची मुलगी आणि चवथी काठेवाडांतील एका संस्थानिकाची मुलगी अशा आहेत.

धर्मकृत्य—सुरतेस नानपुऱ्यांत एक धर्मार्थ दवाखाना स्थापण्याकरितां तेथील धार्मिक पारशी वीस हजार रुपयांचे फंड जमा करीत आहेत.

बंगालच्या दुष्काळाकरितां मद्रासेंत वर्गणी जमा होत आहे तिची रकम आजपर्यंत १,१८,७०२ रुपये झाली आहे.

आत्महत्या—मद्रासेंत दर महिन्यास सुमारें १४ मनुष्यें आत्महत्या करून मरतात यावरून तेथें लोकवस्ती कशी आहे हें समजतें. मुंबई शहरांत अशा कारणानें मरणाराची संख्या जास्तच आहे असें समजतें. या प्रकाराचें कारण असें आहे कीं, आमचे लोक व विशेषतः स्त्रिया एकाद्या यत्किंचित् कारणासाठींही प्राणत्याग करितात. सु० प०

रा० रा० श्रीधर विठ्ठल दाते यांचा खटला तारिख ९ रोजीं चालणार ह्मणून लिहिलें होते त्याप्रमाणें मौजे भोकर्ण तालुके नशिराबाद येथील एका मारवाड्या कडून जुलमानें पैसा (रुपये १२०) घेतल्याचे आरोपावरून तारीख १४ रोजीं एरंडोलमुक्कामीं मे० फ० क्ला० माजिस्त्रेट लिच साहेब बहादूर असिस्टंट कलेक्टर यांणीं दोन वर्षे सक्त मजुरीची कैद व १००० रुपये दंड आणि दंड न दिल्यास सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा ठरवून दाते यांस तुरुंगांत पाठविले. त्याप्रमाणें ते येथें येऊन दाखल झाले. ह्या शिक्षेचे ठरावावर अपील अर्जे सेशन कोर्टास दाखल होऊन अपिलाचा निकाल होईपर्यंत शिक्षा तकूब ठेवण्याचा मे० सेशन जज्ज साहेब बहादूर यांणीं हुकूम केला व अपिलाची चौकशी तारिख २९ रोजीं होणार आहे. याचप्रमाणें दुसरा खटला:—मौजे हसावद येथील नारायण मगनीराम शेट वगैरे असामी तीन यांजपासून जुलमानें पैसा (रुपये १००) घेतल्याबद्दल खटला चालू होता त्याची चौकशी पुरी होऊन अपराध शाबीद नाहीं ह्मणून तारीख १३ रोजीं दाव्यांतून दोषमुक्त करून सोडून दिले.:—पूर्वीं अपील झालेला मुकदमा परत चौकशीस माजिस्त्रेट साहेबाकडे गेला. त्यात रावसाहेब शिवराम पांडुरंग पोलिस इन्स्पेक्टर यांची साक्ष तारीख २३ रोजीं अंमळनेर मुक्कामीं होण्याकरितां त्यांस समन्स झाले आहे असें कळतें. खा० वै०

दारू! दारू!! दारू!!! पोष्टाचे स. इं. मि० गोविंद आपाजी हे कांहीं कारणाकरितां येथें (अलिबाग) आले आहेत. इसम मजकूर हे थोडे दिवसांपूर्वीं दारू खाऊन गटारांत हवा खात पडले होते. पुन: परवांचे दिवशीं सुरासांत दिवसा अगदीं निमग्न होऊन बरीच मौज उडवीली व अखेरीस रात्रीं शंकराचे देवळा जवळील एका वेश्येचे घराचे मागील दाराच्या विदिरींत पडले. नंतर कांहीं शिपायांनीं वगैरे बाहेर काढून पोलिसापर्यंत खटला गेला होता. हर हर!! काय हा दारूचा दारुण परिणाम!! प्रतिष्ठित व अब्रुदार लोकांनीं इच्या नादीं लागून आपली छी, थू, करून घ्यावी काय?—

## चालू राज्यव्यवस्थेचा मासला!

मागें पेशवाईच्या राज्यव्यवस्थेंत सरकारी कामदार वगैरे अधिकारी लोक गरीब रयतेस वेठ बिगारीस वगैरे लावीत असें आज आपणास समजत असल्यामुळें आह्मी त्या राज्यव्यवस्थेस अनेक तऱ्हेनीं नांवें ठेवतो, पण आज ज्या राज्यव्यवस्थेस आह्मी "उत्तम" असें ह्मणतों त्या व्यवस्थेंत अशा प्रकारच्या कांहीं गोष्टी होत आहेत किंवा नाहीं हे आह्मी पहात नाहीं. व कदाचित कांहीं गोष्टी आपणास समजल्या तरी त्या प्रसिद्ध रीतीनें बोलण्याची आमचे अंगीं शक्ती नाहीं; या गोष्टीचा विचार केला ह्मणजे फार वाईट वाटतें. हल्लींच्या काळीं आमची अशी स्थिति असल्यामुळें जे आह्मी सर्व लोक चालू राज्यव्यवस्थेंतील सर्व प्रकार लक्षपूर्वक न पहातां किंवा ते प्रकार आमच्यापुढें नेहमीं साहजीक रीतीनें पुढें येत असतां त्यांकडे दुर्लक्ष करून माजीराज्यव्यवस्थेस शिव्या देतों. त्यास आह्मी लोकांस, काळेंकरून प्राप्त होणाऱ्या त्या वेळच्या नव्या राज्यव्यवस्थेंतील लोक, शिव्या देतील अगर आह्मास ते तोंडपुज्ये तरी ह्मणतील. आतां असें होणें हें स्वाभाविकच आहे हे खरें कारण राजा हा जरी प्रजेचा नोकर असला तरी राजाच्या हातांत सर्व सत्ता असल्यामुळें राजाविरुद्ध प्रजेच्याने वागवत नाहीं; परंतु असें असले तरी मागच्यास शिव्या देतेवेळीं, शिव्या देणाऱ्यांनीं चालू व्यवस्थेबद्दल थोडासा तरी विचार केला पाहिजे. वेठ बिगारीपासून प्रजेस जो त्रास होतो तो चुकविण्याकरतां किंवा तो चुकविण्याचा डौल घालण्या करतां हल्लींच्या सरकारानें आरंभीं ठराव केला व त्या योगानें, निदान त्या बाबतींत तरी, हें सरकार आज स्तुतीस पात्र झाले आहे; परंतु विचार करून पाहिले तर तो ठराव कागदी घोडा होता असें ठरते. कारण आजचा प्रकार त्याच्या उलट आहे असें कित्येक वेळीं ऐकून व कित्येक वेळीं प्रत्यक्ष अनुभवानें दिसून येतें. थोड्या दिवसांपूर्वीं आमच्या येथें पांच चार सरकारी कामदार बसले असतां त्यांत या संबंधानें विचार चालू असून एकानें जी एक गोष्ट सांगितली ती नवीच विचार करण्यासारखी असल्यामुळें आह्मी आपल्या वाचकांपुढें ठेवतो व त्यांत किती खरेपणा आहे याचा आमच्या वाचकांनीं व आमचे सरकारानें विचार करावा अशी आमची त्यांस विनंती आहे. त्यांणीं जी गोष्ट सांगितली ती अक्षरशहा नव्हे पण मुद्यापुरती सारांश रूपानें अशी होती कीं; "खानदेश व गुजराथ यांच्या सरहद्दीवर जो डांग ह्मणून प्रदेश आहे तेथें सर्व रानटी लोकांची वस्ती असून त्यांस सरकारी कामदारा कडून फारच त्रास होत असतो. नेहेमीं प्रांतांत फिरणाऱ्या लोकांच्या स्वाऱ्या त्या भागांत गेल्या ह्मणजे शिकारी करतां ह्मणून तेथें फार दिवस मुक्काम करतात आणि त्या रानटी शेकडो लोकांस पकडून आणून शिकारीच्या कामास लावतात. नुसत्या शिकारीच्याच कामास लागतात इतकेच नव्हे तर त्या कामदारांच्या स्वाऱ्या त्या रानटी प्रदेशांत जाऊन उतरल्या ह्मणजे आसपासच्या पांच चार गावच्या लोकांस आपला कामधंदा सोडून त्यांच्या तैनातीस रहावें लागतें. तंबू वगैरेच्या भोंवतीं पलटणी प्रमाणें पहारा करावा लागतो. पलटणींचे पहारेकरी जसे दोन दोन तासांनीं बदलतात त्या प्रमाणें त्या रानटी लोकांचे पाहारेही दोन किंवा चार तासांनी बदलतात. हा पाहारा बदलण्याच्या वेळचा देखावा फार मोठा चमत्कारीक असतो, पाहारा बदलण्याची वेळ आली ह्मणजे आसपासचे शे पन्नास लोक अर्धी चतकोर भाकरी बगलेंत मारून भराभर जमू लागतात व सर्व जमले ह्मणजे पूर्वीच्या पाहारेकऱ्यांच्या जागीं हे राहून जुने आपापल्या घरीं निघून जातात. या पाहाऱ्यावर येणाऱ्या एकाद्या रानटी मनुष्याशीं कोणी कारकून किंवा शिपाई थोडा सरळपणानें असा बोलूं लागला तर तो मनुष्य त्या स्वारी बरोबरील मनुष्यांस ह्मणतो कीं, या कामदाराची ही स्वारी आणखी येथें किती दिवस राहणार? इंग्रज सरकार न्यायी न्यायी ह्मणून जें ह्मणतात ते हेंच काय? आमचे वंशज पूर्वींच्या राज्यांत चांगल्या ठिकाणीं रहात असल्यामुळें त्यांस वेठबिगारीचे नेहेमी प्रसंग येत व त्याकरताच त्यांणीं आपली सर्व तेथील वस्ती उठवून अशा रानांत केली, पण या न्यायी राज्यांत अशा रानांतही आह्मास त्रास भोगावा लागतो.' जे लोक अशा रीतीनें वागविले जातात त्यांस त्या अधिकाऱ्यांकडून कांहीं योग्य अशी मजुरी तरी मिळत असेल असें ह्मणावें तर तेंही नाहीं! एकादा चांगला अधिकारी असल्यास त्याकडून फार झाले तर पैसा दोन पैसे प्रमाणें मिळतात.' ही गोष्ट ज्या वेळीं त्या गृहस्थानें आमच्या घरीं बसून सांगितली तेव्हां, सरकारी चाकरींत नाहींत असेही कांहीं गृहस्थ हजर होते, पण तसें असले तरी, न्यायाच्या कोर्टांत ही गोष्ट सिद्ध करण्याचा बोजा जर आमच्यावर पडला तर तो आमच्यानें उचलेल असें वाटत नाहीं. व त्याकरितां आह्मी त्याविषयीं एक अक्षरही जास्त न लिहितां आपल्या सरकारास इतकीच विनंती करतों कीं, त्याणें या गोष्टीच्या खरेखोटेपणाचा फार बारीक रीतीनें विचार करावा. ज्यांच्यावर असा प्रसंग येतो ते लोक साधारण रीतीनें बऱ्या स्थितींतले असते तर वेगळे, पण ते फारच विपत्तीच्या स्थितींत असतात. त्यांची गरीबी दाखविणारी एक गोष्ट दुसऱ्या एका सरकारी कामदारानें आह्मास सांगितली ती आपल्या वाचकांपुढें ठेवतों. ही गोष्ट सांगणाऱ्या गृहस्थास २०० रुपये दरमहा पगार व शिवाय भत्ता वगैरे असा असून तो बाराही महिने कामाच्या संबंधानें प्रवास करणारा आहे. तो ह्मणाला कीं, "सुमारें एक वर्षापूर्वीं मी व माझा स्वयपाकी असे एके दिवशीं मोठ्या कष्टानें रानटी प्रदेशांतील एका खेडेगांवीं जाऊन पोंचलों. तेव्हां आमचा भुकेनें अगदीं प्राण व्याकूळ होऊन गेला असल्यामुळें तेथें राहाणाऱ्या एका मनुष्याच्या झोपड्यांत जाऊन त्या घराच्या मालकास एक रुपया दिला व त्याजपाशीं थोडे तांदुळ मागितले. त्यावर तो दीन वाणीनें ह्मणाला कीं, माझ्या घरांत उभ्या वर्षांतही तांदुळ येत नाहीं माझ्या घरांत फक्त दोन शेर नागली आहेत त्या पाहिजे असल्यास तुह्मास दळून देतो. हा कामदार अगदीं भुकेला असल्यामुळें त्यानें ते नागलीचें पीठ घेतलें व त्याजबळ थोडें मीठ मागितलें. त्यावर तो ह्मणाला, आह्मास महाराज मीठ कोठून मिळणार? दोन शेर नागली द्याव्या तेव्हां वाणी मूठभर मीठ देतो! शेवटीं दुसऱ्या एक दोन घरीं शोध केल्यावर मीठ न मिळाल्यामुळें त्या कामदारानें मिठावाचून त्या नागलीच्या भाकरी करून खाल्या!! ही गोष्ट आमच्या सरकारास खरी वाटत असेल काय? अगर माहीत तरी असेल काय? असेल तर ती तशीच असावी असें सरकारचें ह्मणणें आहे कीं काय?

अ. द.

हे पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.